SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road,
Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of -
Ceramic Wall & Floor Tiles,
Vitrified Tiles, Paving Blocks,
Marble & Granite
सोनी टाईल्स ॲण्ड मार्बल इंडस्ट्रिज



संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, बुधवार दि. २६.०८.२०२६ | अंक नं. १२५ | वर्ष ६९ वे | दैनिक वर्ष ६३ वे | ANR/022/2018-2020

तृप्त व्हावेत सकलजन.. हीच इच्छा मनोमन..
नगरची अस्सल गुजराथी थाली
४० वर्षांपासून आपल्या सेवेत..
आता आणखी एक थाळी सोबत नवीन थाळी...
दाल बाटी चुरमा थाळी...
फॅमिली करिता स्वतंत्र व्यवस्था..
पार्सल सुविधा उपलब्ध
Home Delivery Via zomato
गुजराथी थाळी
(दर बुधवारी व रविवारी)
उपाध्याय बंधू यांचे
गुजराथ भोजनालय
जुना कापड बाजार, खिस्त गल्ली, पहिला मजला, अहमदनगर, फोन : ८८८८१६४२२२
शाखा- इंदौर ◦ धुळे ◦ मालेगांव ◦ नाशिक

चलो दुबई
खरेदी सोन्याची, होईल भाग्याची..
सोने-चांदीच्या खरेदीवर स्क्रॅचकार्डव्दारे
जिंका दुबई ट्रिप
किंवा आकर्षक गिफ्ट बॉक्स
₹50000/- सोने खरेदीवर
₹20000/- चांदी खरेदीवर
₹5000/- भिशी योजनेत सहभागी व्हा.
₹5000/- फॉर्मिंग ज्वेलरीच्या खरेदीवर
स्क्रॅचकार्डव्दारे जिंका दुबई ट्रिप
किंवा आकर्षक गिफ्ट बॉक्स व सोबतच
मजुरीही सर्वात कमी.
सावेडी, अहिल्यानगर
9272422001/02
बुधवार चालु
22 कॅरेट सोन्याचा
सर्वात कमी भाव, सर्वात कमी मजुरी..
₹999/-*
दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी
खास रक्षाबंधनानिमित्त सोन्या-चांदीच्या राख्या आकर्षक पॅकिंगमध्ये उपलब्ध.
सोन्याची राखी - ₹ 999/- पासुन
चांदीची राखी - ₹ 199/- पासुन

# केंद्र सरकारचा सर्वसामान्यांना दिलासा; साखरेचे दर १५ ते २० रुपयांनी घसरले

नगर – केंद्र सरकारने साखरेच्या वाढत्या किमतींवर नियंत्रण मिळवण्यासाठी उचललेल्या कडक पावलांचे सकारात्मक परिणाम आता अहमदनगरच्या बाजारपेठेतही दिसून येऊ लागले आहेत. केंद्र सरकारने १० लाख टन कच्च्या साखरेच्या शुल्कमुक्त आयातीला परवानगी दिली असून, देशभरात साठेबाजीविरुद्ध धडक कारवाई सुरू केली आहे. या धोरणात्मक निर्णयामुळे नगरमधील साखरेचे दर तब्बल १५ ते २० रुपयांनी कमी झाले आहेत. याबाबत नगरमधील साखरेचे घाऊक व्यापारी प्रितेश प्रकाश पोखरणा यांनी या वृत्तास दुजोरा दिला आहे.

गेल्या काही दिवसांपासून साखरेच्या दरात सातत्याने वाढ होत होती. आगामी सणांच्या पार्श्वभूमीवर साखरेचा दर शतकीपार जाईल, अशा अफवा सोशल मीडियावर पसरत होत्या. त्यामुळे महिलांचे किचन बजेटही कोलमडले होते. महिलांमध्ये सरकारविरोधी संताप वाढत असतानाच केंद्र सरकारने साखरेच्या दरावर नियंत्रण मिळविण्यासाठी कडक पावले उचलली. शुल्कमुक्त साखर आयातीचा निर्णय सरकारने घेतल्यानंतर एकाच रात्रीत साखरेच्या भावात मोठी घसरण झाल्याचे दिसून आले. शासकीय हस्तक्षेपानंतर साखर कारखान्याकडील दरांमध्ये मोठी घसरण नोंदवली गेली आहे. एकेकाळी तेजीत असलेले साखरेचे कारखान्याकडील दर आता प्रति किलो ५५ रुपयांपर्यंत किंवा त्यापेक्षाही खाली आले आहेत. घाऊक बाजारातील या घसरणीमुळे सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून, महागाईच्या चक्रातून काहीसा सुटकारा मिळाला आहे.

घाऊक बाजारात आणि कारखान्यांमध्ये साखरेचे भाव गडगडले असले, तरी नगरच्या किरकोळ बाजारात (किराणा दुकानांमध्ये) त्याचे परिणाम अद्याप पूर्णपणे दिसून आलेले नाहीत. काही दिवसांपूर्वी किरकोळ बाजारात साखरेचे दर ७५ रुपये प्रति किलोवर पोहोचले होते. घाऊक बाजारातील या मंदीचा थेट आणि पूर्ण फायदा सामान्य ग्राहकांना किराणा दुकानांमधून मिळण्यासाठी अजून काही कालावधी लागण्याची शक्यता वर्तवली जात आहे. थेट नगरमध्ये किराणा दुकानांमधून ५८ ते ६० रुपये प्रति किलो साखर मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

### १० लाख टन कच्च्या साखरेची आयात ठरली गेमचेंजर

देशातील नागरिकांची दिवाळी आणि आगामी सण गोड व्हावेत, यासाठी केंद्र सरकारने अत्यंत धडाकेबाज निर्णय घेत थेट १० लाख टन कच्ची साखर शुल्कमुक्त आयात करण्याचा निर्णय घेतला. तसेच साखरेचा कृत्रिम तुटवडा निर्माण करणाऱ्या साठेबाजांवर थेट कारवाईचा इशारा दिला. सरकारच्या या निर्णयामुळे साठेबाजांचे धाबे दणाणले.

कारखान्यांनीही एका रात्रीत साखरेचे दर मोठ्या प्रमाणात कमी केले. त्यामुळे घाऊक बाजारात साखरेचे दर ७ हजार ५०० रुपयांवरून थेट ६ हजार रुपये प्रति क्विंटलपर्यंत खाली आले. घाऊक बाजारातील घसरणीचा हा कल पाहता, येत्या काही दिवसांत किरकोळ बाजारातही साखरेचे भाव उतरून ग्राहकांना अधिक दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

### गृहिणींना मोठा दिलासा

आगामी सणासुदीच्या पार्श्वभूमीवर साखरेचे दर शंभरी गाठणार अशा अफवा सोशल मीडियावर पसरल्या होत्या. परिणामी दिवाळीसारख्या सणाला मोठ्या प्रमाणात साखरेची गरज लागते. अशा परिस्थितीत साखरेचे दर १०० रुपयांवर जाण्याच्या भितीने महिलांमध्ये संताप दिसून येत होता. मात्र, आता सरकारने शुल्कमुक्त साखर आयात करण्याचा निर्णय घेवून गृहिणींना मोठा दिलासा दिला आहे. घाऊक बाजारातील मंदीमुळे अहिल्यानगरच्या किरकोळ बाजारातही साखरेचे भाव गडगडले असून, लवकरच स्वस्तः साखरेचा लाभ गृहिणींना मिळेल, अशी शक्यता आहे. साखरेचे भाव कमी झाल्यामुळे आगामी सणांच्या पार्श्वभूमीवर गृहिणींनी सुटकेचा निःश्वास सोडला आहे.

# मराठा-कुणबी वंशावळ समित्यांना पुन्हा आणखी एका वर्षाची मुदतवाढ

मुंबई – मराठा आरक्षणाचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आलेला असतानाच राज्य सरकारने मराठा-कुणबी प्रमाणपत्रांच्या प्रक्रियेसंदर्भात महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा जात प्रमाणपत्र तसेच जात वैधता प्रमाणपत्रासाठी आवश्यक असलेल्या वंशावळ जुळवणी समित्यांना आणखी एक वर्षाची मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामुळे प्रलंबित वंशावळ जुळवणीची प्रकरणे पूर्ण करण्यासाठी समित्यांना आता ३० जून २०२७ पर्यंत काम करता येणार आहे.

राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये वंशावळ जुळवणीचे काम अद्याप पूर्ण झालेले नसल्याने सरकारने हा निर्णय घेतला आहे. विशेष म्हणजे, अपूर्ण राहिलेली वंशावळ जुळवणीची प्रकरणे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देशही संबंधित समित्यांना देण्यात आले आहेत. त्यामुळे कुणबी अथवा मराठा-कुणबी प्रमाणपत्र मिळवण्याच्या प्रतीक्षेत असलेल्या अर्जदारांना या निर्णयाचा फायदा होण्याची शक्यता आहे.

कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा जात प्रमाणपत्रासाठी वंशावळ जुळवणीची प्रक्रिया तालुकास्तरावर केली जाते. त्यासाठी तहसीलदारांच्या अध्यक्षतेखाली समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. या समित्यांना यापूर्वी देण्यात आलेली मुदत ३० जून २०२६ रोजी संपली होती. मात्र, राज्यातील अनेक भागांमध्ये वंशावळ जुळवणीची प्रक्रिया पूर्ण झालेली नसल्याने सरकारने आता १ जुलै २०२६ ते ३० जून २०२७ या कालावधीसाठी समित्यांना मुदतवाढ दिली आहे. महाराष्ट्र शासनाने यासंदर्भातील शासन निर्णय २५ ऑगस्ट २०२६ रोजी जारी केला आहे. मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत झालेल्या चर्चेनंतर आणि देण्यात आलेल्या निर्देशांच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आल्याचे सांगितले जात आहे.

### जरांगे पाटलांच्या आंदोलनापूर्वी निर्णय

या निर्णयाला सध्याच्या मराठा आरक्षणाच्या राजकीय आणि सामाजिक पार्श्वभूमीमुळे विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी २९ ऑगस्टपासून अंतरवाली सराटी येथे पुन्हा आंदोलन सुरू करण्याची घोषणा केली आहे. मराठा समाजाच्या कुणबी नोंदी शोधणे, त्या आधारे पात्र व्यक्तींना कुणबी प्रमाणपत्र देणे आणि मराठा-कुणबी व कुणबी-मराठा नोंदींच्या आधारे प्रमाणपत्रांची प्रक्रिया गतिमान करणे, हे आंदोलनातील प्रमुख मुद्द्यांपैकी आहेत. त्यामुळे आंदोलनाच्या काही दिवस आधीच वंशावळ जुळवणी समित्यांना एक वर्षाची मुदतवाढ देण्याचा सरकारचा निर्णय चर्चेत आला आहे.

# सहकारी बँकांमधील दहा वर्ष जुन्या संचालकांना सरकारकडून तूर्त दिलासा

नगर – सहकारी बँकांच्या संचालकांना १० वर्षांचा कार्यकाळ पूर्ण झाला म्हणून निवडणूक लढविण्यास अपात्र ठरविण्याबाबत सहकार कायद्यात कोणतीही तरतूद नाही. बँकिंग रेग्युलेशन कायद्यातील अपात्रतेच्या तरतुदी सरकारने अद्याप स्वीकारलेल्या नसतानाही त्यांची परस्पर अंमलबजावणी करणे नियमबाह्य असून, १० वर्षांचा कार्यकाळ पूर्ण झालेल्या कोणत्याही संचालकांना निवडणूक लढविण्यापासून अपात्र ठरवू नका, असे स्पष्ट आदेश राज्य सरकारने सहकार निवडणूक प्राधिकरणास दिले आहेत.

सहकार क्षेत्रातील विशेषत: सहकारी बँकांमधील ठरावीक लोकांची मक्तेदारी मोडीत काढण्यासाठी आणि या बँकांच्या निवडणुकीची दारे सर्वसामान्यांसाठी उघडण्यासाठी केंद्र सरकारने गेल्या वर्षी बँकिंग नियमन कायद्यात सुधारणा केली. या कायद्यातील कलम १०एमधील तरतुदीनुसार जिल्हा मध्यवर्ती तसेच नागरी सहकारी बँकांमधील १० वर्षे किंवा त्याहून अधिक काळ संचालक राहिलेल्या व्यक्तीला कोणत्याही बँकेची पुढील निवडणूक लढविण्यास बंदी घालण्यात आली आहे. एवढेच नव्हे तर ३ वर्षांच्या कुलिंग पीरियड ठरविण्यात आला असून त्यानंतरच संबंधित संचालकास पुन्हा निवडणूक लढविण्याची मुभा देण्यात आली आहे. या कायद्याचा आधार घेत राज्य सहकार निवडणूक प्राधिकरणाने १६ जानेवारी २६ रोजी एक परिपत्रक काढून सहकारी संस्थांच्या निवडणुकांसाठी ही अट लागू केली. त्यानुसार जिल्हा मध्यवर्ती तसेच सहकारी बँकांच्या निवडणुकीत १० वर्षांचा कार्यकाळ पूर्ण झालेल्या संचालकांनी पुन्हा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल केल्यास तो अमान्य करून उमेदवारास निवडणूक लढविण्यास अपात्र ठरविण्याचे आदेश आयोगाने निवडणूक निर्णय अधिकार्यांचना दिले होते. यानुसार अनेक जिल्हा मध्यवर्ती तसेच सहकारी बँकांच्या निवडणुकीत मातब्बर संचालकांना घरचा रस्ता दाखविण्यात आला.

राज्याच्या सहकार कायद्यात किंवा सन २०१४ च्या निवडणूक नियमात नसलेली तरतूद लागू करून राज्य निवडणूक प्राधिकरण अन्याय करीत असल्याचा दावा करीत काही बँकांच्या संचालकांनी राज्य सरकारकडे दाद मागितली होती. त्याची दखल घेत सहकार विभागाने राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर आणि विधि व न्याय विभाकडून कायदेशीर अभिप्राय मागविला होता. बँकिंग नियमन कायद्यानुसार १० वर्षांचा कार्यकाळ पूर्ण झाला म्हणून सहकारी बँकांच्या संचालकांना निवडणूक लढविण्यास अपात्र ठरविण्याचा अधिकार निवडणूक निर्णय अधिकार्यांधना नाही , असा अभिप्राय त्यांनी दिला आहे. या निर्णयाचे सहकारी बँकिंग क्षेत्रात आनंदाचे वातावरण पसरले आहे. असे मत अहिल्यानगर जिल्हा बँक असोसिएशन चे चेअरमन सत्येन मुंदडा यांनी व्यक्त केले.

# घर फोडून सोन्या-चांदीचे दागिने लंपास; गुन्हा दाखल

नगर – शहरातील रामवाडी परिसरात भरदिवसा घरफोडी झाल्याची घटना समोर आली आहे. चोरट्यांनी बंद घराचा दरवाजा उघडून कपाटातील तब्बल ७० हजार रुपये किमतीचे सोन्या-चांदीचे दागिने चोरून नेले आहेत. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रामवाडीतील बालभवन शेजारी राहणाऱ्या रविना किशोर उल्हारे (वय ३०) यांच्या घरात ही चोरी झाली. उल्हारे कुटुंब १२ ऑगस्ट ते १७ ऑगस्ट दरम्यान बाहेरगावी गेलेले असताना अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश केला. चोरट्याने कपाटातील डब्याचे कुलूप तोडून आत ठेवलेली १५ हजार रुपयांची सोन्याची मोहनमाळ, २० हजार रुपयांचे गंठण, कानातील फुले, बाळी आणि नाकातील मुरणी असा सोन्याचा ऐवज लंपास केला.

याशिवाय चोरट्याने कपाटात ठेवलेल्या चांदीच्या सहा बांगड्या, गळ्यातील साखळी, कडे, कमरेचा पट्टा आणि पायातील मासोळी असा एकूण ७० हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला.

घरी परतल्यानंतर चोरीचा प्रकार लक्षात येताच रविना उल्हारे यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दिली. पोलिसांनी अज्ञात चोराविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०५ (अ) अंतर्गत गुन्हा नोंदवला आहे. पोलीस निरीक्षक बी. एम. वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक चाहेर पुढील तपास करत आहेत.

# रक्षाबंधनपूर्वी सोन्या-चांदीच्या दरात वाढ

नवी दिल्ली – देश-विदेशातील बाजारांमध्ये सलग पाचव्या आठवड्यात सोने-चांदीच्या किंमतीत तेजीचा कल पाहायला मिळाला आहे. यासोबतच ऑगस्ट २०२६ हा महिना गेल्या २७ वर्षांतील म्हणजे साल १९९९ नंतर सोन्यासाठी सर्वोत्तम महिना ठरताना दिसत आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात सोन्याची किंमत ४,६५० डॉलर प्रति औंसवर उसळली आहे, तर भारतातील बाजारांमध्येही सोन्याच्या दरात तेजीच्या धारा बसरल्या आहेत.

याआधी जानेवारी २०२६ मध्ये सोन्याच्या किमती तब्बल ५,६०० डॉलर औंसच्या उच्चांकवरून १७ टक्के घसरल्या आहेत. तसेच डॉलरमधील घसरण, अमेरिकेच्या कर्जाविषयी चिंता आणि बॉण्ड बाजार ऑगस्ट महिन्यात सोन्याच्या दरांमधील अलीकडील वाढीमागील प्रमुख कारणे मानली जात आहेत.

देशांतर्गत बाजाराच्या सुरुवातीला बुधवारी सकाळी चढ्द वर सोन्याचा वायदा किंमतीत गेल्या काही दिवसांपासून चढ-उतार पाहायला मिळत असून या दरम्यान २६ ऑगस्ट रोजी सोन्याचे फ्युचर्स किंचित वधारले आणि १.६३ लाखांवर स्थिर राहिले आहेत. तसेच चांदीचा वायदा भाव ०.६०% किंवा १५०० रुपयांनी वाढून २,४५,६६८ रुपयांवर पोहचला आहे. याशिवाय बुधवारच्या सुरुवातीच्या सत्रात २४ कॅरेट सोन्याचा दर १,६३,४३० रुपये १० ग्रॅम होता, तर २२ कॅरेट सोने १,४९,८११ रुपये १० ग्रॅम झालेले. त्याचवेळी, गेल्या आठवड्यात २४ कॅरेट सोन्याचा भाव ३.१८% हून अधिक वाढला तर, गेल्या वर्षभरात ६१.४% वाढ नोंदवली गेली. तसेच चांदीची किंमत २,४५,५४० रुपये प्रति किलो आहे.

# घराचे कुलूप तोडून सोन्याची साखळी लंपास

नगर – नगर तालुक्यातील सोकेवाडी येथे बंद घराचा कडी-कोयंडा तोडून अज्ञात चोरट्याने कपाटातील पन्नास हजार रुपये किमतीची सोन्याची साखळी चोरून नेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध चोरीचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

फिर्यादी रुपाली विकास पालवे (वय २६ वर्षे, मूळ रा. सोकेवाडी, हल्ली रा. दरेवाडी, अहिल्यानगर) यांचे सोकेवाडी येथे घर आहे. दिनांक २० जुलै २०२६ ते २२ ऑगस्ट २०२६ च्या दरम्यान त्यांचे राहते घर बंद होते. या बंद घराचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने घराच्या उत्तरेकडील दरवाजाची आतील कडी कशाच्या तरी सहाय्याने तोडली आणि आत प्रवेश केला. त्यानंतर घरातील लाकडी कपाटाचे कुलूप तोडून कपाटात ठेवलेली अकरा ग्रॅम वजनाची आणि पन्नास हजार रुपये किमतीची बारीक कड्यांची सोन्याची साखळी चोरून नेली. फिर्यादी रुपाली पालवे यांनी दिलेल्या तक्रारीवरून एमआयडीसी पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०५ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

घटनेची माहिती मिळताच सहाय्यक पोलीस निरीक्षक थोरात आणि पोलीस हवालदार खेडकर यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.

DCM SHRIRAM
Growing with trust
Fenesta
Better by Design
भारताची नंबर 1
खिडक्यांचा आणि दरवाजांचा ब्रँड
uPVC | Aluminium | Doors | Façades
आता अहिल्यानगर (अहमदनगर) मध्ये आहे.
CHANDAN GLASS
Plot No.23, Industrial Estate, Kedgaon, Ahilyanagar-414005, Maharashtra.
Ph: 9860119223,9823189592

पाऊल टाका स्टाईलमध्ये!
एकाच छताखाली हजारो स्टाईल्सची निवड!
पुरुष । महिला । मुलांसाठी
प्रत्येक प्रसंगासाठी योग्य, आरामदायी आणि ट्रेंडी फुटवेअर
पुरुषांसाठी
महिलांसाठी
मुलांसाठी
१००% ओरिजनल ब्रँड्स
उत्तम क्वॉलिटी
वाजवी दर
संपूर्ण कुटुंबासाठी
उपलब्ध नामांकित ब्रँड्स
adidas NIKE PUMA Reebok SKECHERS
asics campus sparx ABROS
Bata RELAXO Paragon crocs
Hush Puppies Lee Cooper RED TAPE RED CHIEF WOODLAND
WILDCRAFT CONVERSE KOLHAPURI मोजडी
आपल्या संपूर्ण कुटुंबासाठी फुटवेअरची परिपूर्ण शॉपिंग!
एम.जी.रोड, कापड बाजार, अहिल्यानगर
आजच भेट द्या !
एकदा या.. पुन्हा याल!
फॅशन आणि मजबुतीचा पत्ता!
Liberty SHOES
लिबर्टी शूज
एम. जी. रोड, कापड बाजार, अहिल्यानगर.
SHOE PALACE
शू पॅलेस
सारडागल्ली, अ.नगर, मो : 9881531536

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# जुन्या वादातून तरुणावर कोयत्याने प्राणघातक हल्ला; तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

नगर - शहरातील मुकुंदनगर भागात जुन्या वादाच्या कारणावरून एका तरुणावर कोयता आणि लाकडी दांड्याने प्राणघातक हल्ला करण्यात आल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या तरुणावर रुग्णालयात उपचार सुरू असून, भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात तीन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अल्तमश नासिर पठाण (वय ३२, रा. शाहीद रो-हाऊसिंग सोसायटी, शहाजी नगर, मुकुंदनगर) हे २४ ऑगस्ट रोजी पहाटे चारच्या सुमारास आर. आर. बेकरीजवळ थांबले होते. त्यावेळी आरोपी अहमद उर्फ डी आसिफ शेख याने जुन्या वादाचा राग मनात धरून अल्तमश यांना शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. त्यानंतर अहमद याने फोन करून साथीदार चुन्या आसिफ शेख आणि भब्या (सर्व रा. दगडीचाळ, मुकुंदनगर) यांना घटनास्थळी बोलावून घेतले. आरोपी चुन्या शेख याने सोबत आणलेल्या कोयत्याने अल्तमश यांच्या डोक्यात आणि उजव्या पायावर वार करून त्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न केला. तसेच भब्या याने लाकडी दांड्याने डाव्या पायावर जबर मारहाण केली. तर अहमद याने लाथाबुक्क्यांनी मारहाण करत ठार मारण्याची धमकी दिली.

या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या अल्तमश पठाण यांना तात्काळ श्रीदीप रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. अल्तमश यांच्या जबाबावरून भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता आणि शस्त्र कायद्यान्वये गुन्हा नोंदवला गेला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सुहास आव्हाड करत आहेत.

# १७ गंभीर गुन्हे दाखल असलेल्या 'लखन'सह तिघांना दोन गावठी कट्ट्यांसह चांदबीबी महालाजवळ पकडले

नगर - ऐतिहासिक चांदबिबी महाल परिसरात गावठी कट्टे आणि जिवंत काडतुसांसह दबा धरून बसलेल्या गुन्हेगारांच्या मुसक्या स्थानिक गुन्हे शाखेने आवळल्या आहेत. तब्बल १७ गंभीर गुन्ह्यांची नोंद असलेला, 'मोक्का' कायद्यांतर्गत आणि अनेक गुन्ह्यांत फरार असलेला कुख्यात गुन्हेगार लक्ष्मण उर्फ लखन कासार अखेर पोलिसांच्या जाळ्यात अडकला आहे.


तिघा आरोपींना २ गावठी कट्ट्यांसह पकडल्यानंतर त्यांच्या समवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

अहिल्यानगर-पाथर्डी रस्त्यावरील चांदबिबी महालाजवळील सर्कलवर विना क्रमांकाच्या पल्सर मोटारसायकलजवळ काही संशयित हत्यारांची विक्री करण्यासाठी उभे असल्याची गुप्त माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली होती. पोलिसांनी पंचांसमक्ष सापळा रचताच संशयितांनी पळ काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, पथकाने पाठलाग करून तिघांनाही जमिनीवर झोपवून बेड्या ठोकल्या. लक्ष्मण उर्फ लखन बाबासाहेब कासार (वय २९, रा.कासारवाडी, ता.पाथर्डी), सचिन राजेंद्र खाडे (वय ३०, रा.अमानवस्ती, तीनखडी, ता. पाथर्डी), अनिकेत दिलीप पटारे (वय २२, रा. धामोरी, ता.नेवासा) असे पकडलेल्या आरोपींची नावे आहेत.

त्यांच्याकडून २ लाखांहून अधिकचा मुद्देमाल जप्त केला असून २ गावठी कट्टे व २ जिवंत काडतुसे, ३ मोबाईल फोन, विना क्रमांकाची पल्सर मोटारसायकल असा एकूण २ लाख २४,०००/ रू. किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे, उपनिरीक्षक अनंत सालगुडे तसेच पोलीस अंमलदार गणेश लोंढे, बाळासाहेब नागरगोजे, फुरकान शेख, रिचर्ड गायकवाड, विशाल तनपुरे, सागर ससाणे, प्रशांत राठोड आणि महादेव भांड यांच्या पथकाने केली. आरोपींविरुद्ध नगर तालुका पोलीस ठाण्यात आर्म क्ट ३/२५ सह महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १४२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# ऑटो रिक्षाची वयोमर्यादा २० वर्षे करा; जिल्हा रिक्षा-टॅक्सी संघटनेची मागणी

नगर - अहिल्यानगर प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाने ऑटो रिक्षांची वयोमर्यादा (कालमर्यादा) सध्याच्या १५ वर्षांवरून वाढवून २० वर्षे करावी, अशी मागणी अहिल्यानगर जिल्हा ऑटो रिक्षा व टॅक्सी चालक-मालक संघटनेच्या वतीने करण्यात आली. यासंदर्भात संघटनेच्यावतीने जिल्हाधिकारी तथा प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाचे अध्यक्ष यांना निवेदन देण्यात आले आहे.

याबाबत दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, सध्याच्या नियमांनुसार ऑटो रिक्षाची वयोमर्यादा १५ वर्षे निश्चित करण्यात आली आहे. मात्र, संघटनेने स्पष्ट केले आहे की, १५ वर्षे पूर्ण झाल्यानंतरही अनेक ऑटो रिक्षा उत्तम स्थितीत असतात. प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून दरवर्षी रिक्षांची कठोर तपासणी करून पासिंग केली जाते. वाहन पूर्णपणे फिट आणि सुरक्षित असेल तरच त्याला पासिंग दिली जाते. त्यामुळे केवळ १५ वर्षे पूर्ण झाली म्हणून चांगल्या चालणाऱ्या रिक्षांवर सक्तीची बंधने लादणे अयोग्य असल्याचे निवेदनात म्हटले आहे. या प्रश्नी रिक्षाचालक-मालक आर्थिक संकटात येऊ नयेत, म्हणून वयोमर्यादा ५ वर्षांनी वाढवून २० वर्षे करावी, अशी भूमिका संघटनेने घेतली आहे. तसेच या मागणीच्या पुष्ट्यार्थ संघटनेने निवेदनासोबत सांगली प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाच्या निर्णयाची प्रतही जोडली आहे. सांगलीत रिक्षांची कालमर्यादा २० वर्ष करण्यात आलेली असल्याने अहिल्यानंतर जिल्ह्यातही तसा निर्णय घ्यावा, अशी मागणी या निवेदनातून करण्यात आली आहे. या निवेदनावर ऑटो रिक्षा व टॅक्सी चालक-मालक संघटनेचे अध्यक्ष अविनाश घुले, कार्याध्यक्ष विलास कराळे पाटील, उपाध्यक्ष सुधाकर साळवे, नासीर खान यांच्या सह्या आहेत.

# नगर येथील सायली कोठारी यांची 'नक्षत्र मास खमण' तपश्चर्या पूर्ण



नगर - वर्धमान ताराचंद कोठारी व सौ. नयना वर्धमान कोठारी यांच्या कन्या तसेच चि . सार्थक वर्धमान कोठारी यांची बहिण कुमारी सायली वर्धमान कोठारी यांनी राष्ट्रसंत आचार्य भगवंत परंपूज्य श्री आनंद ऋषीजी महाराजसाहेब यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त कठोर अशी 'नक्षत्र मास खमण' तपश्चर्या यशस्वीरीत्या पूर्ण केली.

महाराष्ट्र प्रवर्तक परंपूज्य श्री कुंदन ऋषीजी महाराजसाहेब, अर्हंविज्या प्रणेता उपाध्याय परंपूज्य श्री प्रवीण ऋषीजी महाराजसाहेब, तसेच पूज्य श्री तीर्थेश ऋषीजी महाराजसाहेब आणि पूज्य श्री आलोक ऋषीजी महाराजसाहेब यांच्या मंगल आशीर्वादाने सायली कोठारी यांनी ही तपश्चर्या पूर्णत्वास नेली.


आचार्य भगवंत श्री आनंद ऋषीजी महाराजसाहेब यांच्या जन्मशताब्दी वर्षाला समर्पित केलेली ही तपश्चर्या असल्याने तिचे विशेष आध्यात्मिक महत्त्व आहे. संयम, त्याग, श्रद्धा, आत्मशुद्धी आणि दृढ संकल्प यांच्या बळावर सायली कोठारी यांनी ही कठोर साधना पूर्ण करून जैन समाजासमोर आदर्श निर्माण केला आहे.

या तपश्चर्येच्या यशस्वी पूर्तीनिमित्त कोठारी परिवार, नातेवाईक, स्नेहीजन तसेच जैन समाजबांधवांकडून कुमारी सायली कोठारी यांचे अभिनंदन करण्यात येत असून, त्यांच्या तपश्चर्येला भावपूर्ण वंदन करण्यात येत आहे. जन्मशताब्दी वर्षाच्या पावन पर्वावर झालेली ही तपसाधना धार्मिक व आध्यात्मिक क्षेत्रात निश्चितच प्रेरणादायी ठरणार आहे. या तपपूर्ती निमित्त अशोक बोरा (अध्यक्ष- समर्पण चातुर्मास समिती, अहिल्यानगर), आदेश चांगेडिया (महामंत्री), विलास कटारिया (कोषाध्यक्ष), अनिल पोखरणा यांनी कु. सायली हिचा सन्मान करुन शुभेच्छा दिल्या.

# अहिल्यानगरमध्ये संगीत नाट्य महोत्सवाला रसिकांचा प्रतिसाद

## संत कान्होपात्रा, ऊस डोंगा परीने जिंकली रसिकांची मने

नगर - महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने अहिल्यानगर येथे आयोजित करण्यात आलेल्या तीन दिवसीय संगीत नाट्य महोत्सवाचा दिमाखदार आणि उत्साही प्रारंभ झाला आहे. शहरातील माऊली सभागृह येथे पार पडलेल्या या महोत्सवाच्या पहिल्याच दिवशी नाट्यरसिकांनी प्रचंड गर्दी करत संगीत नाट्यपरंपरेप्रती आपली अगाध निष्ठा आणि प्रेम पुन्हा एकदा सिद्ध केले आहे.


येथील माऊली सभागृहात संगीत नाट्य महोत्सवात कलाकृती सादर करताना कलाकार.

महोत्सवाच्या उद्घाटनाचा सोहळा अत्यंत उत्साहात पार पडला. याप्रसंगी मराठी रंगभूमी आणि संगीताच्या क्षेत्रातील दिग्गज मंडळींनी आपली विशेष उपस्थिती लावून कार्यक्रमाची शोभा वाढवली. यामध्ये ज्येष्ठ रंगकर्मी सुरेश साखळकर, ज्येष्ठ संगीतकार पंडित डॉ. विकास कशाळकर, ज्येष्ठ रंगकर्मी विजयकांत कुलकर्णी आणि मुकुंद मराठे यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती लाभली होती. या दिग्गजांच्या हस्ते महोत्सवाचा श्रीगणेशा झाल्यामुळे या सोहळ्याला एक वेगळेच वजन प्राप्त झाले.

महोत्सवाच्या पहिल्या दिवशी श्रुती संगीत निकेतन, अहिल्यानगर यांच्या वतीने संगीत ऊस डोंगा परी हा अतिशय लोकप्रिय संगीत नाट्यप्रयोग सादर करण्यात आला. या नाटकाचे लेखन ना. वि. कुलकर्णी यांनी केले असून, मास्टर कृष्णराव यांचे लाभलेले संगीत आणि सुरेश साखळकर यांचे नेटके दिग्दर्शन यामुळे हा प्रयोग अत्यंत रंगला. अभिजात संगीत, कसदार अभिनय आणि उत्कृष्ट रंगमंचीय सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली.

मराठी संगीत रंगभूमीच्या समृद्ध परंपरेचा हा वारसा पुढे चालवण्यासाठी २५ ते २७ ऑगस्ट २०२६ या कालावधीत सायंकाळी ६:३० वाजता माऊली सभागृहात हे प्रयोग सुरू आहेत. २७ ऑगस्टपर्यंत नगरकरांना ही पर्वणी उपलब्ध असणार आहे. संगीत, नाट्य, अभिनय आणि गायन यांचा सुरेख संगम असलेल्या या महोत्सवामुळे मराठी रंगभूमीची वैभवशाली परंपरा नव्या पिढीपर्यंत पोहोचत आहे. पहिल्याच दिवशी मिळालेला अभूतपूर्व प्रतिसाद पाहता संगीतप्रेमींमध्ये मोठा उत्साह दिसून येत आहे.

अहिल्यानगर आणि परिसरातील सर्व नाट्यरसिक, संगीतप्रेमी, विद्यार्थी व कलारसिकांनी पुढील दोन दिवसांच्या या संगीत नाट्यप्रयोगांचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

# शाडू मातीपासून विद्यार्थ्यांनी साकारल्या पर्यावरणपूरक गणेशमूर्ती

## दहा उत्कृष्ट मूर्तींना मनपाचे प्रत्येकी १ हजार रुपयांचे पारितोषिक

नगर - महापालिका व रेसिडेन्शियल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने माझी वसुंधरा अभियानांतर्गत विद्यार्थ्यांसाठी शाडू मातीपासून पर्यावरणपूरक गणेशमूर्ती बनविण्याची कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली. या कार्यशाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धन, नैसर्गिक साधनसंपत्तीचे जतन तसेच पर्यावरणपूरक गणेशोत्सवाबाबत जनजागृती करण्यात आली.


येथील रेसिडेन्शियल हायस्कूलमध्ये मातीचा गणपती तयार करताना विद्यार्थी. (छाया - लहू दळवी)

या कार्यशाळेत रेसिडेन्शियल विद्यालयातील विद्यार्थ्यांनी शाडू मातीला आकार देत श्री गणेशाच्या विविध रूपांतील सुंदर मूर्ती साकारल्या. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी शिक्षकांनीही या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेत गणेशमूर्ती बनविण्याचा आनंद घेतला. यावेळी विद्यार्थ्यांनी पर्यावरणपूरक गणपतीची स्थापना तसेच पारंपरिक पद्धतीने काढण्यात येणारी गणेशमूर्तीची मिरवणूक याबाबत जनजागृतीपर कला सादर करून उपस्थितांचे लक्ष वेधले.

कार्यक्रमास महापौर ज्योतीताई गाडे, आयुक्त यशवंत डांगे, विद्यालयाचे प्राचार्य विजय जाधव, उपप्राचार्य भाऊसाहेब पवार, पर्यावरणप्रेमी सुरेश खामकर, प्रभाग अधिकारी श्याम गोडळकर, तुकाराम भांगरे, मूर्तिकार बालाजी बल्लाळ, पर्यवेक्षक शरद सोनवणे, वैशाली मरकड, धनंजय मस्के, भरतसिंग सारवान आदींसह विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते.

महापौर गाडे म्हणाल्या, अहिल्यानगरकरांचा आवडता उत्सव म्हणजे गणेशोत्सव होय. विद्यार्थ्यांनी नवीन गणपतीची मूर्ती विकत न घेता आपल्या हाताने शाडू मातीला आकार देऊन भक्ती व श्रद्धेने तयार केलेल्या गणेशमूर्तींची पारंपरिक पद्धतीने घरी स्थापना करावी. स्वच्छ, सुंदर व हरित अहिल्यानगर बनविण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये शाडू मातीपासून पर्यावरणपूरक गणेशमूर्ती बनविण्याची कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. या माध्यमातून पर्यावरण संवर्धन, नैसर्गिक साधनसंपत्तीचे जतन तसेच पर्यावरणपूरक गणेशोत्सवाबाबत जनजागृती करण्याचे काम होणार आहे. शाडू मातीपासून गणेशमूर्ती बनविण्याचे पर्यावरणाच्या दृष्टीने अनेक फायदे असल्याचे महापौर ज्योतीताई गाडे यांनी सांगितले.

आयुक्त डांगे म्हणाले, अहिल्यानगर शहरामध्ये पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी जनजागृती केली जात आहे. शाडू मातीच्या गणेशमूर्तींचा मोठ्या प्रमाणात वापर करावा, जेणेकरून प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींना पर्याय उपलब्ध होईल आणि त्यामुळे होणारे जलप्रदूषण टाळता येईल.विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हाताने बनविलेला शाडू मातीचा गणपती घरी घेऊन जाऊन १४ सप्टेंबर रोजी भक्तिभावाने त्याची स्थापना करावी, असे आवाहन त्यांनी केले.

पर्यावरणप्रेमी सुरेश खामकर यांनी पर्यावरण संवर्धनाबाबत मनोगत व्यक्त केले.

सूत्रसंचालन धनंजय म्हस्के यांनी केले. आभार वैशाली मरकड यांनी मानले.


अहिल्यानगर शहरात २६ ऑगस्ट रोजी ईद-ए-मिलाद निमित्त जुने कोर्ट येथील जामा मज्जिदमध्ये नमाज अदा केल्यानंतर झेंडा मिरवणुकीला सुरुवात झाली.

# देशी-विदेशी दारूची विक्री करताना एकाला पकडले

नगर - कोतवाली पोलीस ठाण्याच्या पथकाने माळीवाडा बसस्थानक परिसरातील गुडलक हॉटेलच्या शेडच्या आडोशाला विनापरवाना देशी-विदेशी दारूची विक्री करणाऱ्या सुनील लक्ष्मण धोत्रे या तरुणाला रंगेहात पकडले. त्याच्याकडून एकूण २ हजार ६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २३ ऑगस्ट रोजी सायंकाळी कोतवाली पोलीस ठाण्याचे गस्ती पथक पेट्रोलिंग करत असताना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली. आरोपीच्या ताब्यातून देशी दारूच्या वेगवेगळ्या बाटल्या आणि किंगफिशर बिअरचे कॅन असा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५(प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस हवालदार रोहिणी दरंदले करत आहेत.

## पेंटम्मा सानम यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर - वारुळाचा मारुती, नालेगाव येथील रहिवासी पेंटम्मा बबनराव सानम (वय ९४) यांचे २६ ऑगस्ट रोजी वृद्धापकाळाने दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर इंदिरानगर स्मशानभूमी, लोणंद येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे २ मुले, ३ मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. नागनाथ सानम यांच्या त्या मातोश्री होत.

## जयवंत खताळ यांचे दु:खद निधन

नगर - सावेडी पाईपलाईन रोड अष्टविनायक कॉलनी येथील रहिवासी जयवंत तात्याबा खताळ (वय ७०) यांचे २३ ऑगस्ट रोजी यांचे आकस्मित निधन झाले. नालेगाव अमरधाम येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे मुलगा, मुलगी, पत्नी, नातवंडे, पुतणे, दोन भाऊ असा परिवार आहे व विशाल व वैशाली खताळ यांचे ते वडील होते.



मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# अहिल्यानगर सायबर वॉरियर्सकडून सायबर जनजागृतीसाठी व्यापक उपक्रम

## पथनाट्यातून ऑनलाइन फसवणुकीच्या प्रकारांबाबत नागरिकांना मार्गदर्शन

नगर - क्विक हील फाउंडेशनच्या सायबर शिक्षण फॉर सायबर सुरक्षा अभियानांतर्गत अहिल्यानगर सायबर वॉरियर्सच्या वतीने शहरातील नागरिकांमध्ये सायबर गुन्हे, ऑनलाइन आर्थिक फसवणूक आणि सुरक्षित डिजिटल व्यवहारांबाबत जनजागृती करण्यासाठी व्यापक जनजागृती उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. शहरातील न्यू चर्च रोड, माणिक चौक येथे झालेल्या या उपक्रमातून नागरिकांना दैनंदिन डिजिटल व्यवहार करताना कोणती काळजी घ्यावी, याबाबत प्रत्यक्ष उदाहरणांच्या माध्यमातून माहिती देण्यात आली.


शहरातील न्यू चर्च रोडवर अहिल्यानगर सायबर वॉरियर्सकडून पथनाट्यातून ऑनलाइन फसवणुकीबाबत जनजागृती करण्यात आली.

या उपक्रमाला प्राचार्य डॉ. अभिजीत कुलकर्णी, चेअरमन, प्रिन्सिपल डॉ. आर. जे. बार्नबस, सेक्रेटरी विशाल बार्नबस यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. तसेच रेव्ह. डॉ. सनी मिसाळ, प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे अधिकारी गायकवाड आणि नगरसेवक दत्ता कवरे यांची प्रमुख उपस्थिती होती. शिक्षिका समन्वयक निवेदिता काळे यांचेही विशेष सहकार्य लाभले.

आजच्या काळात मोबाईल, इंटरनेट, ऑनलाइन बँकिंग आणि विविध डिजिटल सुविधांचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. त्याचबरोबर सायबर गुन्हेगारांकडून नागरिकांची आर्थिक फसवणूक करण्यासाठी नवनवीन पद्धतींचा वापर केला जात आहे. अशा परिस्थितीत नागरिकांनी डिजिटल व्यवहार करताना जागरूक व सतर्क राहणे आवश्यक आहे. हीच बाब लक्षात घेऊन अहिल्यानगर सायबर वॉरियर्सच्यावतीने नागरिकांमध्ये सायबर सुरक्षेची जाणीव निर्माण करण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला.

अहिल्यानगर सायबर वॉरियर्सच्या सदस्यांनी सायबर सुरक्षेवर आधारित प्रभावी पथनाट्य सादर केले. पथनाट्यातून नागरिकांना सायबर गुन्हेगारांकडून वापरल्या जाणाऱ्या विविध क्लृप्त्यांची माहिती देण्यात आली. बनावट दूरध्वनी करून बँक अधिकारी किंवा अन्य शासकीय अधिकारी असल्याचे भासवणे, खात्याची माहिती मागणे, बक्षीस किंवा नोकरीचे आमिष दाखवणे, बनावट संदेश पाठवून संकेतस्थळाची लिंक उघडण्यास भाग पाडणे, क्यूआर संकेतांकाच्या माध्यमातून फसवणूक करणे, युपीआय व्यवहाराच्या नावाखाली पैसे लुबाडणे अशा विविध प्रकारांबाबत नागरिकांना जागरूक करण्यात आले.

एकवेळ वापरला जाणारा संकेतांक (ओटीपी), वैयक्तिक ओळख क्रमांक (पिन), संकेतशब्द, बँक खात्याची माहिती, एटीएम किंवा डेबिट कार्डची माहिती तसेच अन्य गोपनीय माहिती कोणत्याही अनोळखी व्यक्तीस देऊ नये, असे यावेळी स्पष्ट करण्यात आले. बँक किंवा कोणतीही अधिकृत संस्था दूरध्वनीवरून गोपनीय माहिती मागत नाही, त्यामुळे अशा प्रकारच्या दूरध्वनीला बळी पडू नये, असेही सांगण्यात आले.

क्यूआर संकेतांकाच्या माध्यमातून पैसे मिळवण्यासाठी क्यूआर संकेतांक स्कॅन करण्याची गरज नसते, याबाबतही नागरिकांना माहिती देण्यात आली. पैसे पाठविण्यासाठी क्यूआर संकेतांक स्कॅन करण्यास सांगितले जात असल्यास विशेष काळजी घ्यावी, असा महत्त्वपूर्ण संदेश देण्यात आला. तसेच अनोळखी व्यक्तीकडून आलेल्या संदेशातील लिंक उघडण्यापूर्वी त्याची सत्यता तपासावी आणि संशयास्पद संकेतस्थळांवर वैयक्तिक किंवा बँकिंग माहिती भरू नये, असे आवाहन करण्यात आले.

# गृहिणी

## आरोग्य

### प्या गुळ आणि हळदीचे दूध

आपल्या भारतीय संस्कृतीत साखरेऐवजी गुळाचा वापर नेहमीच आरोग्यदायी मानला गेला आहे. आरोग्याची काळजी घेण्यासाठी रासायनिक साखरेचा त्याग करून गुळाचा वापर करणे केव्हाही उत्तम ठरते. रात्री किंवा योग्य वेळी गुळ आणि दुधाचे मिश्रण एकत्र करून सेवन करणे शरीरासाठी गुळ आणि दुधाचे मिश्रण पोटाच्या आरोग्यासाठी अतिशय उत्तम मानले जाते. जेवणानंतर किंवा रात्री झोपताना हे दूध प्यायल्याने पोट साफ होण्यास मदत होते, तसेच पोटात गॅस होणे आणि अपचन यांसारख्या तक्रारी दूर होतात. रक्ताची कमतरता दूर होते: गुळामध्ये लोहाचे प्रमाण भरपूर असते, तर दूध हे शरीराला ताकद देणारे पौष्टिक पेय आहे. या दोघांच्या सेवनाने रक्ताभिसरण सुधारते, शरीरातील रक्ताची कमतरता भरून निघते आणि थकवा नाहीसा होतो. हाडांचे आरोग्य बळकट होते: दुधामध्ये कॅल्शियम आणि प्रथिने मोठ्या प्रमाणात असतात, जे हाडांच्या आणि दातांच्या मजबुतीसाठी अत्यंत आवश्यक असतात. गुळामधील खनिजे या प्रक्रियेला अधिक बळकटी देतात. मानसिक ताण कमी होऊन उत्तम झोप लागते: दिवसभराच्या धावपळीनंतर जर थकवा जाणवत असेल, तर गुळ घातलेले कोमट दूध पिण्यामुळे मनाला आणि शरीराला आराम मिळतो. यामुळे ताणतणाव कमी होतो आणि गाढ तसेच शांत झोप लागण्यास मदत होते. त्वचेचे तेज वाढते: गुळामध्ये रक्त शुद्ध करण्याचे नैसर्गिक गुणधर्म असतात. जेव्हा आपण दुधासोबत त्याचे सेवन करतो, तेव्हा शरीरातील घातक घटक बाहेर पडतात. याचा सकारात्मक परिणाम त्वचेवर दिसून येतो आणि चेहरा तजेलदार बनतो. शरीराला ऊर्जा आणि उबदारपणा मिळतो: गुळाचा प्रभाव शरीराला उबदार ठेवणारा असतो. त्यामुळे विशेषतः हिवाळ्यात किंवा सर्दी-खोकल्याचा त्रास असताना गुळाचे दूध पिणे अत्यंत फायदेशीर ठरते.

## पाककला

### लसूण-मिर्चीचा खर्डा

**साहित्य :** हिरव्या मिरच्या १०-१२ (तिखटपणा आवडीनुसार, देठ काढून (मधून कापलेल्या), लसूण १५-२० पाकळ्या (सोललेल्या), शेंगदाणे २ मोठे चमचे (भाजलेले आणि कूट केलेले किंवा अख्खे), जिरे १ छोटा चमचा, मीठ, चवीनुसार तेल, २ मोठे चमचे कोथिंबीर बारीक चिरलेली (ऐच्छिक)

**कृती :** सर्वप्रथम गॅसवर एक कढई किंवा तवा गरम करायला ठेवा. त्यात १ चमचा तेल घालून हिरव्या मिरच्या आणि लसूण पाकळ्या मध्यम आचेवर चांगल्या परतून घ्या. मिरच्यांचा रंग थोडा बदलेपर्यंत (तपकिरी डाग पडेपर्यंत) परता. आता त्यात जिरे घालून काही सेकंद परता आणि गॅस बंद करा. हे मिश्रण थंड होऊ द्या. आता खलबत्त्यात (पारंपरिक चवीसाठी) किंवा मिक्सरच्या भांड्यात (पल्स मोडवर - फक्त एकदा-दोनदा फिरवून) हे भाजलेले मिश्रण जाडसर कुटून घ्या. खर्डा कुटतानाच त्यात भाजलेले शेंगदाणे आणि चवीनुसार मीठ घाला. खर्डा अगदी पेस्ट करायचा नाही, तो थोडा जाडसरच (ठसकेबाज) असावा. आता एका कढईत उरलेले १ चमचा तेल गरम करा. त्यात कुटलेला खर्डा घालून मंद आचेवर १-२ मिनिटे पुन्हा परतून घ्या. यामुळे खर्डा जास्त दिवस टिकतो आणि चवही छान येते. वरून बारीक चिरलेली कोथिंबीर घालून गॅस बंद करा.

## वास्तू

### तर प्रगतीत अडथळे...

घरामध्ये तुटलेले काच, बंद पडलेली घड्याळे, जुने आणि फाटलेले जोडे किंवा न वापरलेले टाकाऊ सामान अजिबात साचवून ठेवू नका. यामुळे प्रगतीमध्ये अडथळे निर्माण होतात. घराची स्वच्छता करणारा झाडू नेहमी नजरेपासून लपवून, आतील बाजूस आडवा ठेवावा.

## सौंदर्य

पपईच्या तुकड्याचा गर चेहऱ्यावर चोळल्याने त्वचा मुलायम होते आणि चेहऱ्यावर छान नैसर्गिक चमक येते.

## सल्ला

कारलं किंवा मेथी जास्त कडू झाली असेल, तर त्यात थोडे चिंचेचे पाणी, गूळ किंवा शेंगदाण्याचा कूट घालावा.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

गुरुवार, दि. २७ ऑगस्ट २०२६

**नारळी पौर्णिमा, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, श्रावण शुक्लपक्ष, धनिष्ठा २६।१६, सूर्योदय ०६ वा. ३१ मि. सूर्यास्त ०६ वा. २९ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** आजचा दिवस फार चांगला आहे. तुमच्या कामाचे कौतुक होईल.

**वृषभ :** प्रवासाचे योग आहेत. आरोग्याची काळजी घ्या.

**मिथुन :** मित्रांचे सहकार्य लाभेल. बऱ्याच दिवसांपासून रखडलेली कामे मार्गी लागतील.

**कर्क :** घरात आनंदाचे वातावरण राहील. नोकरीच्या ठिकाणी वरिष्ठांची साथ लाभेल.

**सिंह :** आत्मविश्वासात वाढ होईल. जुन्या गुंतवणुकीतून चांगला परतावा मिळेल.

**कन्या :** बोलण्यावर संयम ठेवाल. वादविवादापासून दूर राहाल.

**तूळ :** व्यवसायात किंवा नोकरीत नवीन संधी मिळतील.

**वृश्चिक :** शत्रू किंवा विरोधक शांत राहतील. कामाच्या ठिकाणी तुमचे महत्त्व वाढेल.

**धनु :** आर्थिक प्राप्ती होईल. तब्येतीच्या बाबतीत आजचा दिवस उत्तम आहे.

**मकर :** महत्त्वाची कामे आजच पूर्ण कराल. मनातील ताणतणाव कमी होईल.

**कुंभ :** सर्जनशील कामात मन रमणार नाही. मुलांकडून एखादी आनंदाची बातमी मिळेल.

**मीन :** नशीब तुमच्या बाजूने असेल. धार्मिक कार्यात आणि शुभकार्यात सहभाग वाढेल.


## शब्दगंध क्र. ७५०३ सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** ३) राजस्थानातील एक प्रसिद्ध पर्वत ५) कारण नसताना; अकारण ७) तापट; रागीट ८) पाठीला आलेला बाक; पोक १०) पूर्व दिशा ११) बगीचा; उद्यान; उपवन १३) एक अमली पदार्थ १५) हक्क; शत्रुत्व; फिर्याद; दुष्मनी १७) मकरसंक्रांती रोजीचे महिलांचे हळदीकुंकू १८) धन; वित्त २१) पदार्थाचा अतिलहान अंश किंवा तुकडा २२) चलाख; हुशार; ताजातवाना

**उभे शब्द :-** १) भास्कर; रवि; सूर्य; दिनकर २) वाढ; वृद्धी; प्रगती ३) टोकदार; नोकदार ४) रममाण; गुंग; रत ६) मंत्र्याच्या नावामागे लावतात तो शब्द ९) झाकण असलेले भांडे १२) अगदी गोल; वाटोळे १३) बोलाचाल; भांडण १४) अधिक चांगला; श्रेष्ठ १६) निकाल; उत्पन्नाचा हिशोब; फडशा १९) जखम वगैरेचा त्वचेवर राहणारा डाग २०) मग्न; लीन; रममाण; लिप्त; गुंग

### शब्दगंध क्र. ७५०२ चे उत्तर



# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार :** शब्दांना ताकद तेव्हाच मिळते, जेव्हा आपण बोलण्याआधी स्वतः कृती करून दाखवतो.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### पाण्यामध्ये रंगहीनता असते, पण महासागराचे पाणी दूरवरून पाहिल्यास निळे का दिसते?

पाणी हा निसर्गाचा असा एक अद्भूत घटक आहे जो मूलतः रंगहीन, पारदर्शक, गंधहीन आणि चव नसलेला असतो. आपण जर समुद्रातून किंवा नदीतून एक ग्लासभर पाणी काढले, तर ते पूर्णपणे स्वच्छ आणि पारदर्शक दिसते. मग प्रश्न असा पडतो की, एक थेंब किंवा एक ग्लास पाणी रंगहीन असताना, हजारो किलोमीटर पसरलेला महासागराचा अथांग साठा दूरवरून पाहिल्यास गडद निळा किंवा हिरवट-निळा का दिसतो? यामागे प्रकाशशास्त्र, रेणूंमधील प्रक्रिया आणि निसर्गाची रचना यांचा अतिशय रंजक खेळ दडलेला आहे. सर्वप्रथम, आपल्याला सूर्याच्या प्रकाशाचे रहस्य समजून घ्यावे लागेल.

आपल्याला सूर्याचा प्रकाश पांढरा किंवा पिवळसर रंगाचा दिसतो, परंतु तो प्रत्यक्षात सात वेगवेगळ्या रंगांचे मिश्रण असतो. या सात रंगांमध्ये तांबडा, नारंगी, पिवळा, हिरवा, निळा आणि जांभळा या रंगांचा समावेश होतो. या सर्व रंगांची स्वतःची अशी एक तरंगलांबी असते. तांबड्या आणि पिवळ्या रंगाची तरंगलांबी लांब असते, तर निळ्या आणि जांभळ्या रंगाची तरंगलांबी खूपच लहान आणि सूक्ष्म असते. जेव्हा हा सूर्यप्रकाश पृथ्वीवर येतो आणि समुद्राच्या अथांग पाण्यावर पडतो, तेव्हा प्रकाशकिरण पाण्याच्या थरांमध्ये वेगाने प्रवेश करतात. पाण्याची रचना आणि त्याचे रेणू या प्रकाशावर आपली प्रक्रिया सुरू करतात. जेव्हा प्रकाशकिरण पाण्याच्या थरांमध्ये खोलवर जातात, तेव्हा पाण्याच्या रेणूंमध्ये लाल, नारंगी आणि पिवळ्या रंगाच्या लांब तरंगलांबी सहजपणे शोषल्या जातात. म्हणजेच, पाण्याचे रेणू हे मोठे रंग आपल्यामध्ये जिरवून घेतात. परंतु, निळ्या रंगाची तरंगलांबी लहान असल्यामुळे तो रंग पाण्याच्या रेणूंवर आदळून शोषला जात नाही, तर तो सर्व दिशेने पसरतो किंवा परावर्तित होतो.

पाण्याचा हा प्रकाश परावर्तित करण्याचा गुणधर्म महासागराला तो सुंदर निळा रंग देतो. या प्रक्रियेसोबतच आणखी एका महत्त्वाच्या घटकाचा मोठा वाटा असतो, तो म्हणजे आकाशाचे परावर्तन. उन्हाळ्याच्या किंवा अगदी स्वच्छ दिवसात आपल्याला आकाश पूर्णपणे निळे दिसते. जेव्हा आकाशातील हा निळा प्रकाश समुद्राच्या पाण्याच्या शांत किंवा लाटा असलेल्या पृष्ठभागावर पडतो, तेव्हा तो आरशासारखा पाण्यातून परावर्तित होतो. पाण्याचा पृष्ठभाग हजारो लहान आरशांप्रमाणे काम करतो आणि आकाशाचा तो निळसर रंग आपल्या डोळ्यांपर्यंत पोहोचवतो. यामुळेच समुद्राच्या नैसर्गिक रंगामध्ये आणखी भर पडते आणि तो दूरवरून पाहणाऱ्याला अधिक ठळक निळा भासतो. तसेच, महासागराच्या खोलीचा आणि पाण्यातील सूक्ष्म घटकांचाही या रंगावर मोठा प्रभाव पडतो. जिथे समुद्राचे पाणी खूप खोल असते, तिथे सूर्यकिरण अधिक आतपर्यंत प्रवास करतात आणि निळ्या रंगाचे परावर्तन वाढल्यामुळे पाणी गडद निळे दिसते. याउलट, किनारपट्टीजवळ किंवा उथळ पाण्यात वाळू, खडक किंवा पाण्यातील लहान वनस्पती (जसे की शेवाळ) यांच्यामुळे पाण्याचा रंग कधीकधी हिरवट किंवा निळसर-हिरवा दिसू लागतो. थोडक्यात सांगायचे तर, पाण्याचा स्वतःचा असा कोणताही निश्चित रंग नसतो. परंतु, जेव्हा सूर्याचे किरण पाण्याच्या अथांग थरांवर आदळतात, तेव्हा प्रकाशाचे होणारे शोषण, पाण्याचे रेणू आणि आकाशाचे परावर्तन या सर्व वैज्ञानिक प्रक्रिया एकत्र येतात आणि आपल्याला निसर्गाचे हे अप्रतिम आणि विलोभनीय निळे रूप पाहण्याची संधी मिळते.

## 'मौन'ची जादू

एका सुंदर गावात 'शांताराम' नावाचे एक सुतार राहत होते. शांताराम आपल्या कामात अत्यंत निपुण होते, पण ते गावात सर्वांत कमी बोलणारे म्हणून ओळखले जात होते. ते दिवसभर आपले काम करायचे आणि संध्याकाळी नदीकाठी जाऊन गप्प बसायचे.

गावातील तरुण मुलांना त्यांचे हे न वागणे खूप विचित्र वाटायचे. एका तरुण मुलाला, ज्याचे नाव सोहन होते, खूप उत्सुकता होती. एके दिवशी तो शांताराम यांच्याकडे गेला आणि म्हणाला, काका, तुम्ही दिवसभर काहीच बोलत नाही? तुम्हाला कंटाळा नाही का येत? माणसाला व्यक्त होण्यासाठी बोलणे गरजेचे असते ना?

शांताराम यांनी स्मितहास्य केले. त्यांनी न बोलता सोहनला आपल्या हातातील लाकडाचा एक तुकडा दिला आणि एक सुंदर खेळणी बनवण्यास सांगितले.

सोहनने उत्साहात काम सुरू केले. पण लाकूड कोरत असताना थोडा निखळला आणि त्याचा छिन्नीचा घाव चुकून खेळणीच्या मुख्य चेहऱ्यावर बसला. चेहरा बिघडल्यामुळे सोहन खूप संतापला. तो जोरात ओरडला, अरेरे! हे काय झाले? माझी सगळी मेहनत वाया गेली! हे लाकूडच खराब आहे! आणि तो चिडून रागाने लाकडाची तुकडे फेकून देणार होता.

तेव्हा शांताराम यांनी हळूच त्याचा हात धरला, कुठलाही शब्द न बोलता त्याला शांत बसवले आणि स्वतः डोळे बंद करून एक दीर्घ श्वास घेतला. त्यांनी काही क्षण पूर्ण मौन पाळले.


थोड्या वेळाने, शांताराम यांनी त्या बिघडलेल्या भागावर एक सुंदर फुलाची नक्षी कोरली. काही मिनिटांतच तो बिघडलेला भाग एका सुंदर डिझाइनमध्ये बदलला आणि खेळणी पूर्वीपेक्षा जास्त आकर्षक दिसू लागली. सोहन थक्क होऊन बघतच राहिला. तो म्हणाला, काका, मी रागात असताना ओरडत होतो आणि काम अजून बिघडवत होतो. पण तुम्ही एकाही शब्दाशिवाय हे कसे सुधारले?

शांताराम यांनी शांतपणे सांगितले, बाळा, जेव्हा मन शांत असते आणि आपण मौन पाळतो, तेव्हा गोंगाट थांबतो आणि आपल्याला समस्येचे खरे उत्तर दिसू लागते. जास्त बोलण्याने ऊर्जा वाया जाते, पण मौन माणसाला आतून मजबूत करते आणि योग्य मार्ग दाखवते.

सोहनला मौनाचे खरे महत्त्व समजले. त्यानेही त्या दिवसापासून नको तिथे बोलणे कमी केले आणि संकटाच्या वेळी मौन धरून विचार करण्याची सवय लावली.

बोध : राग किंवा संकटाच्या वेळी न बोलता (मौन राहून) घेतलेला निर्णय नेहमी योग्य ठरतो. मौन ही कमजोरी नसून ती मनाची ताकद आहे.

## आत्मशक्ति



### अध्यात्मिक मनोरंजन

बरेचसे लोक या जगातील संगीत ऐकून आपले मनोरंजन करतात. त्यासाठी ते रेडिओ ऐकतात, ऑडिओ कॅसेट व सीडी कॅसेट खरेदी करतात. संगीत जलशांत जातात, स्वतः संगीत रचतात.बाह्य संगीतामुळे आमच्यात आनंद, शांती, उत्तेजन आणि प्रेरणा इत्यादी भावना जागविल्या जातात. परंतु अंतरी मिळालेल्या संगीताचा अनुभव बाहेरच्या संगीतापासून मिळालेल्या अनुभवापेक्षा उत्कृष्ट प्रतीचा आणि वेगळाच असतो. हा अनुभव आम्हाला धुंद करतो, त्यामुळे आत्मा वरच्या मंडळात ओढला जातो. जो आनंद अंतरीय संगीतापासून मिळतो तो ह्या जगातील आनंदाच्या कितीतर पट अधिक असतो. जो कोणी अंतरीय संगीत ऐकतो तो ते सतत ऐकण्याची इच्छा करतो. ज्या लोकांनी आत्मिक संगीत ऐकले त्यांना ह्या जगातील संगीत त्या संगीतापुढे फिके वाटते म्हणून ते बाह्य जगातील रेडिओ पासून प्रसारण पावलेल्या संगीतापेक्षा आत्म्यापासून प्रसारित झालेले संगीत ऐकणेच जास्त पसंत करतात. सुंदर बागेत फिरणे महापुरुषांनी आत्मानंद समजावून देण्यासाठी आणखी एक उदाहरण घेतले आणि ते म्हणजे सुंदर अशा बागेत फिरण्याचा अनुभव. बागबगीचे एक सुंदर स्थान सम जले जाते. हिमालयाच्या पायथ्याशी बसलेल्या काश्मिर खोऱ्यात किंवा स्वित्झर्लंडच्या मनोरम पर्वतांच्या रांगात किंवा पर्वतीय प्रदेशात फिरण्याचे सौभाग्य प्राप्त झाले असेल तर तेथील जंगल, सरोवरे, जलधारा आणि फुलबाग आम्हाला किती आनंद देतात हे समजेल. निसर्गाच्या या अतिशय मनोरम आणि सुंदरतम अशा ठिकाणी सहल करणे हा मनाला ताजे करणारा स्फूर्तीदायक व मनस्थितीचा संपूर्ण कायापालट करणारा अनुभव असतो. परंतु अंतरीय मंडळातील आत्मप्रवास हा भौगोलिक प्रवासापेक्षा कितीतरी पट आनंद देतो व आश्चर्यचकित करतो. ह्या जगाची बाह्य नैसर्गिक सुंदरताही अंतरीय अति आश्चर्यजनक सुंदरतेचे फक्त एक प्रतिबिंब आहे.१९ व्या शतकातील संत स्वामी शिवदयालसिंहजी महाराजांनी आत्मिक आनंदाचे वर्णन बऱ्याचवेळा रेखाटले आहे. त्यांनी वेगवान कारंजे, सुंदर बगीचे आणि अमृत (क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### श्लोक पठण

कारण त्याने त्याविषयी त्याच्या आईच्या उदरात असतानाच ऐकलं होतं. एखाद्या बाळाला खूप कमी वयात श्लोक मुखोद्गत होतात कारण त्याच्या जन्माच्या आधी त्याचे वडील ते श्लोक म्हणत असतात. आपण हेही बघतो की, संगीतकाराची मुलं लहान वयातच सहजतेने संगीत शिकतात.

शिवानीदीदी : याचं कारण त्या मुलांवर स्पंदनांचा थेट प्रभाव पडतो. ही सगळी स्पंदनांच्या शक्तीची उदाहरणं आहेत. आपण 'शुद्धता' हा शब्द लक्षात ठेवला पाहिजे. घरातील स्पंदनं सुसंगत ठेवणं हेच आपलं प्राधान्य असलं पाहिजे. बाळाच्या वाढीबाबत प्रत्येक गोष्टीवरून आपण वाद घालू नये. असे वाद आई-सासू आणि अगदी नवरा-बायको यांच्यातही होऊ शकतात.

सुरेश ओबेरॉय : जर आपण असा विचार केला की, बाळाचं आणि माझं प्रेमस्वरूप अस्तित्व हेच माझं प्राधान्य आहे, तर आपण स्वतःला तपासू शकतो. शिवानीदीदी : कित्येकदा आया, 'ते माझं बाळ आहे', असा विचार करतात.

सुरेश ओबेरॉय : त्यांना असं वाटतं की ते बाळ म्हणजे फक्त त्यांची मालमत्ता आहे.

शिवानीदीदी : त्यांची इच्छा असते की, त्यांच्या बाळाला इतर कोणाच्याही हस्तक्षेपाशिवाय त्यांना हवं तसं वाढवायला मिळावं. पण असा विचार कोणी करू नये कारण त्या बाळाचं म्हणजे आत्म्याचं कुटुंबातील इतर आत्म्यांबरोबरही नातं असतं. जर कुटुंबातल्या सगळ्या सदस्यांकडून चांगली स्पंदनं मिळाली तर बाळाचा फायदा होईल हे नेहमी लक्षात ठेवायला हवं.

सुरेश ओबेरॉय : अनेक आजीआजोबा अशी तक्रार करतात की, त्यांचा मुलगा आणि सून त्यांना बाळाच्या आयुष्यात दखल देऊ देत नाहीत.

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

बायको म्हणाली, माझं ऐकत का नाही?
नवरा म्हणाला, ऐकतो गं, पण समजून घेत नाही!
बायको म्हणाली, म्हणजे?
नवरा म्हणाला, तेच तर माझं लग्नानंतरचं शहाणपण आहे!

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* महाराष्ट्राचे 'राधानगरी' अभयारण्य खालीलपैकी कोणत्या प्राण्यासाठी प्रसिद्ध आहे? - गव्यांसाठी

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद - आरोग्य संवर्धन

### कडधान्ये व डाळी यांचे महत्त्व

शिबीधान्ये म्हणजे शेंगेतून निघणारे द्विदल धान्य होय. मूग, मसूर, चवळी, हरभरा, तूर, पावटे, मटकी, उडीद, वाटाणे, मोहरी, भुईमूग, वाल, कुळीथ, सोयाबीन, तीळ इत्यादी कडधान्यांचा त्यामध्ये समावेश होतो. आयुर्वेदानुसार ही सर्व धान्ये कमी-अधिक प्रमाणात मधुर, लघु, मलावष्टंभ, कृशता उत्पन्न करणारी, शीत, कटू विपाकी व पथ्यकर आहेत. सर्व डाळींचा विचार केला, तर त्यात कोणत्याही वनस्पतीपेक्षा प्रथिनांचे प्रमाण जास्त असते. अगदी कमी पैशांत पौष्टिक अन्न म्हणून डाळी व कडधान्यांचा उपयोग होतो. म्हणूनच त्याला गरीब जनतेचे मांसअन्न असे म्हणतात. जे मांसाहार करत नाहीत, त्या सर्व लोकांनी कडधान्ये व डाळी महत्त्वाचे अन्न म्हणून प्रामुख्याने आहारात घ्यावे. कारण यामधून दैनंदिन जीवनामध्ये लागणारी प्रथिने तसेच शारीरिक व मानसिक उत्साह वाढविण्याची ऊर्जा मिळते.

औषधी गुणधर्म : साधारणतः १०० ग्रॅम डाळी व कडधान्यामध्ये १७ ते २४.५ प्रथिने असतात. फक्त सोयाबीनमध्ये प्रथिनांचे प्रमाण ४३.२ टक्के असते. प्रथिनांव्यतिरिक्त डाळीमध्ये ३४५ उष्मांक, १४० मिलिग्रॅम कॅल्शिअम, ३०० मिलिग्रॅम फॉस्फरस, लोह ८ मिलिग्रॅम, थायमीन ०.४ मिलिग्रॅम, रायबोफ्लेविन ०.१८ ते ०.२६ मिलिग्रॅम व मेद ०.५ ते ५.३ ग्रॅम या प्रमाणात असते. यालाही अपवाद फक्त सोयाबीनचा आहे. त्यात मेदाचे प्रमाण प्रतिशत १९.७ असते.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं- ८७९३४००४००




नृत्य दर्पण नृत्य अकादमी प्रस्तुत 'नवविध भक्ती आणि मधुरा भक्ती' नृत्याविष्कारात सहभागी झालेल्या विद्यार्थिनी.

# भक्तिरसाने रंगला 'नवविध भक्ती आणि मधुरा भक्ती'चा नृत्याविष्कार

नगर – नृत्य दर्पण नृत्य अकादमी प्रस्तुत 'नवविध भक्ती आणि मधुरा भक्ती' हा भक्तिरसाने न्हाऊन निघालेला नृत्याविष्कार माऊली सभागृहात संपन्न झाला. भक्ती, प्रेम, समर्पण आणि आत्मनिवेदनाचे विविध भाव विद्यार्थिनींनी नृत्याच्या माध्यमातून प्रभावीपणे साकारले.

कार्यक्रमाची सुरुवात मंगलारंभ, गणेश वंदना, सरस्वती वंदना आणि नटराज वंदनेने झाली. त्यानंतर मधुरा भक्तीवर आधारित विविध नृत्यरचना सादर करण्यात आल्या. विविध परीक्षा स्तरांतील विद्यार्थिनींनी या नृत्यरचनांमध्ये सहभाग घेत आपल्या कलागुणांचे दर्शन घडविले.

यानंतर नवविध भक्तीचा विशेष नृत्याविष्कार सादर करण्यात आला. श्रवण भक्ती, कीर्तन भक्ती, स्मरण भक्ती, पादसेवन भक्ती, अर्चन भक्ती, वंदन भक्ती, दास्य भक्ती, सख्य भक्ती आणि आत्मनिवेदन भक्ती या भक्तीच्या नऊ प्रकारांचे नृत्य, अभिनय आणि भावमुद्रांच्या माध्यमातून सुरेख दर्शन घडले.

कार्यक्रमादरम्यान अकादमीच्या विद्यार्थिनींच्या परीक्षा यशाचाही गौरव करण्यात आला. यावर्षी झालेल्या परीक्षांमध्ये विद्यार्थिनींनी उल्लेखनीय कामगिरी करत यश संपादन केले. विशेषतः पाचव्या परीक्षेतील सर्व विद्यार्थिनींनी उत्तीर्ण होत यशाची परंपरा कायम ठेवली, याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

कार्यक्रमासाठी शिर्डीच्या कु. ऋतुजा धनेश्वर आणि सौ. पल्लवी धनेश्वर पाटील प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थिनींच्या नृत्यकलेचे तसेच संचालिका सौ. अपर्णा रोहित थत्ते यांच्या संकल्पना व मार्गदर्शनाचे कौतुक केले. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन भारती फडके यांनी केले.

# जिल्हास्तर युवा पुरस्कारासाठी ४ सप्टेंबरपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

नगर – युवा हा समाजाचा अविभाज्य घटक असून विकास प्रक्रियेत त्यांचा सहभाग महत्त्वाचा आहे. समाजातील युवांची संख्या पाहता त्यांच्यासाठी स्वतंत्र विचार करण्याची आवश्यकता आहे. राज्य शासनाने राज्याचे युवा धोरण–२०१२ जाहीर केले असून, त्याअंतर्गत जिल्ह्यातील युवकांनी केलेल्या सामाजिक कार्याची योग्य दखल घेऊन त्यांना प्रोत्साहन मिळावे यासाठी जिल्हास्तरावर युवा पुरस्कार देण्यास शासनाने मान्यता दिली आहे. जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अहिल्यानगर यांच्या वतीने जिल्हास्तर युवा पुरस्कारासाठी पात्र युवक–युवती तसेच संस्थांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

जिल्हास्तर युवा पुरस्कारासाठी सन २०१८–१९, २०१९–२०, २०२०–२१, २०२१–२२, २०२२–२३, २०२३–२४, २०२४–२५ आणि २०२५–२६ या वर्षांसाठी अर्ज मागविण्यात आले आहेत.

युवक–युवतींसाठीच्या पात्रता निकषांनुसार अर्जदाराचे वय पुरस्कार वर्षातील १ एप्रिल रोजी १३ वर्षे पूर्ण ते ३१ मार्च रोजी ३५ वर्षांपर्यंत असणे आवश्यक आहे. जिल्हा पुरस्कारासाठी अर्ज करणाऱ्या अर्जदाराचे त्या जिल्ह्यात सलग पाच वर्षे वास्तव्य आवश्यक आहे. केलेल्या कार्यासंदर्भातील पुरावे अर्जासोबत जोडणे आवश्यक असून, त्यामध्ये वृत्तपत्र कात्रणे, प्रशस्तीपत्रे, छायाचित्रे व फोटो यांचा समावेश आहे.

संस्थांसाठीही स्वतंत्र पात्रता निकष निश्चित करण्यात आले आहेत. संस्थेने केलेल्या कार्यासंदर्भातील पुरावे अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. अर्जदार संस्था सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १८६० किंवा मुंबई पब्लिक ट्रस्ट क्ट १९५० नुसार पंजीबद्ध असणे आवश्यक आहे. संस्थेने पुरस्कार प्राप्त झाल्यानंतर किमान दोन वर्षे क्रियाशील कार्यरत राहणार असल्याचे हमीपत्र देणे आवश्यक असून, संस्था नोंदणी झाल्यानंतर किमान पाच वर्षे कार्यरत असणे आवश्यक आहे.


जिल्हास्तर युवा पुरस्कारासाठी पात्रताधारक युवक–युवती तसेच संस्थांनी विहित नमुन्यातील अर्जासह आपले प्रस्ताव ४ सप्टेंबर पर्यंत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अहिल्यानगर येथे कार्यालयीन वेळेत जमा करावेत, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी, अहिल्यानगर यांनी केले आहे.

# प्रेरणादायी अक्षरधन

## परमेश्वरा शरण जावे

"मुसाफिर"

संकलन: दिशान फिचर्स




ते खेळायला बसला. यानं डाव टाकला डाव उलटा पडला। तो लगे म्हणाला, पहिला डाव देवाला दिला. मी वाईट देईन देवाला. पण देवानं मात्र पावावं मला. देवाला काय वेडा समजला ? तुझे सगळे इरादे ठाउक आहेत त्याला. संकट आली, की आठवायचं देवाला. एरवी देव कोण कुठला? देवाचीच ही कथा. मग इतरांशी कोण जाणती व्यथा ? खरं तर महाभारत म्हणतं.

प्राण कुणाला प्रिय नाहीत ? दुःख कुणाला पीडा देत नाही? मग प्राण सगळ्यांचेच रक्षावे. दुःख सगळ्यांचेच हरावे. पण हे कुणी कुणाला सांगावे? जो तो म्हणेल हे दुसऱ्याने करावे? जिथे देवाचीच नाही दयामाया, दुसऱ्याचे तर सगळेच वाया ।

दुसऱ्यांना छळतात लोक. अगदी देवाला साक्षी ठेवून । असतो ना उन्माद । कुठं पर्वा त्यांना मग देवाची. मग भक्तांना वाटतं, देवाला नाही आमची काळजी, दया, माया देवाची आटली. पण असं नाही. देव आहे जागा, पण तो उगाच नाही करीत त्रागा. त्याच्या हाती माणसाचा धागा. तो वेळ येताच ज्याची त्याला दाखवतो जागा । फक्त तुम्ही त्या सदुणी परमेश्वराची थोरवी गा। संत जनाबाई देतात मग ग्वाही

गाता विठोबाची कीर्ती
महापातके जळती । आठळिया पाय त्याचे
मग तुम्हा भय कैचे।।

सदुणांना जपा. मग दुष्टांना विसरा. धरा त्या कारुण्यमयीईश्वराचे पाय. तुमचा शत्रू मग म्हणेल हाय हाय वाईट करणारे रडतील धाय धाय. पण तुकाराम महाराज म्हणतात.

ऐसे सांगो जाता जना। न ये कोणाचिया मना।
बरे विचारोनि पाहे । तुज अंती कोण आहे ? ।।
तुका म्हणे रांडलोका। अंती जासील यमलोका ।।

सगळ्यांचं भलं चिंतणं, हेच परमेश्वर पावणं, पण कुणाला हे समजणं? दुष्ट विचार अवलंबण। पण शेवटी का ते मदतीला येणं ? ते पाप असणं. शेवटी यातनांच्या डोही बुडणं। माणसा, देवाची भक्ती ही देवाला बुडविण्याची युक्ती म्हणून तू वापरावी? हेवेदावे मनी बाळगसी ? देवापेक्षाही स्वतःला अधिक जपसी? पण अखेरी काळाचे भक्ष होसी ।

एक जपानमधली गोष्ट आहे. एक युवती आपल्याजवळ एक सुबक बुद्धाची मूर्ती बाळगत असे. या मूर्तीची पूजा करीत असे. ती छोटीशी मूर्ती समोर ठेवून ती तिच्यापुढे उदबत्तीच्या काड्या लावून आपल्या आवडत्या देवाला खूप सुगंध देण्याचा विचार करीत असे. पण उदबत्त्या पटवल्या, की त्यांची सुंगधी वलये शेजारच्या खोलीत शिरत. तिथल्या मोठमोठ्या बुद्धांच्या मूर्तीला सुख देत। या तरुणीला त्याचा राग येई. आपला बुद्ध महत्वाचा. मग तिने पूर्वीच्या खिडक्या बंद केल्या, पण उदबत्तीचा वास आता पश्चिमेकडून बाहेर जावू लागला. तिकडच्या बुद्धांच्या मूर्तींना सुखावू लागला. मग तिने पश्चिमेच्याही खिडक्या बंद केल्या. आता फक्त तिच्याच प्रिय बुद्धाला सुवास मिळू लागला. पण दुसरे एक संकट उभे ठाकले. उदबत्तीच्या धुराने त्या बंद खोलीत गुदमरायला लागले. बुद्धदेव महत्वाचा की, आपले प्राण जपण्याचा प्रयत्न करायचा? तिने देवापेक्षा स्वतःचे प्राण मोलाचे मानले. उदबत्त्यांचे पेटलेले जुडगे पाण्यात बुडवून विझवून टाकले। आधी जपायचे मला। फावल्या वेळी पुजायचे देवाला।

**– किशोर गांधी**



माध्यमिक शिक्षक सोसायटीच्या चेअरमनपदी बिनविरोध निवड तसेच भुईकोट किल्ला परिसरातील पंडित नेहरू हिंदी विद्यालयाच्या मुख्याध्यापकपदी पदोन्नती झाल्याबद्दल शिक्षक नेते बाबासाहेब बोडखे यांचा आमदार अक्षय कर्डिले यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी सोमनाथ वामन, मयुर कराळे, ठाकूरदास परदेशी, सुभाष कराळे आदी उपस्थित होते.

# अद्वैत क्लिनिक येथे ३१ ऑगस्टला हाडेविकार व कॅन्सर शिबीर

नगर – येथील अद्वैत क्लिनिक यांच्यावतीने ३१ ऑगस्ट रोजी भव्य हाडेविकार आणि कॅन्सरच्या शिबिराचे सवलतीच्या दरात आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये जुनाट हाडांचे विकार तसेच कॅन्सरच्या लक्षणांवर उपचार करण्यात येणार आहेत. या शिबिराचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन संयोजकांच्यावतीने हाडेविकार तज्ज्ञ डॉ. आकाश वैद्य आणि कॅन्सरविकार तज्ज्ञ डॉ. अद्वैत वैद्य यांनी केले आहे.

हाडांच्या शिबिरामध्ये गुडघेदुखी, सांधेबदल शस्त्रक्रिया, जॉईंट रिप्लेसमेंट, आर्थोस्कोपिक (लिगामेंट) सर्जरी, फ्रॅक्चर ट्रिटमेंट तसेच सांधेदुखी वगैरे विकारांवर उपचार होणार आहेत. डॉ. आकाश वैद्य स्वतः शिबिरातील सहभागी रूग्णांची तपासणी करणार आहेत. डॉ. आकाश वैद्य हे सुप्रसिद्ध हाडांचे तज्ज्ञ आहेत. ते एमबीबीएस, एमएस (आर्थो) सर्जन असून, त्यांना दक्षिण कोरिया येथे गुडघ्याच्या शस्त्रक्रियाबद्दल फेलोशीप मिळालेली आहे. जॉईंट रिप्लेसमेंट सर्जरी व आर्थोस्कोपिक सर्जरीमध्येही त्यांना फेलोशीप प्राप्त झाली आहे.

कॅन्सर शिबिरात तोंडामध्ये न भरणारी जखम, स्तनांमध्ये वाढणारी गाठ, पोटामध्ये वाढणारी गाठ, लघवीमध्ये रक्त येणे, संडासद्वारे रक्तस्त्राव, सतत वजन कमी होणे आदि लक्षणांच्या रूग्णांची तपासणी करण्यात येणार आहे. तोंडाचे (जीभ, जबडा, टाळू) कॅन्सर, थायरॉईड कॅन्सर, फुफ्फुसाचा कॅन्सर, अन्ननलिकेचा कॅन्सर, जठर–आतडे कॅन्सर, प्रोस्टेट ग्रंथी, किडनी–मुत्राशय कॅन्सर, स्किन कॅन्सर, ब्रेस्ट कॅन्सर, गर्भाशय व अंडाशयाचा कॅन्सर आदींसह इतर प्रकारच्या कॅन्सर रूग्णांवर सवलत दरात उपचार करण्यात येणार आहेत.

नगर शहरातील कोर्ट गल्ली कॉर्नरला असलेल्या अद्वैत क्लिनिक या नूतनीकृत वास्तूत हे भव्य शिबीर होणार असून, याची वेळ सकाळी १० ते २ आहे. शिबिरास येताना रूग्णांनी आपली जुनी औषधोपचाराची व रिपोर्टची फाईल आणणे आवश्यक आहे. यासाठी आगाऊ नावनोंदणी आवश्यक असून, माहिती व नोंदणीसाठी ०२४१–२३४१७५९, ८५८५०८६००८ या क्रमांकांवर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# इनरव्हील क्लबच्यावतीने ओंकारनगर शाळेला बागकामाचे साहित्य भेट



इनरव्हील क्लब ऑफ अहमदनगरच्या वतीने ओंकारनगर प्राथमिक शाळेला बागकामाचे विविध साहित्य भेट देण्यात आले.

नगर – अहिल्यानगर महापालिकेच्या केडगाव येथील प्रथम आय.एस.ओ.मानांकन प्राप्त व विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबवणाऱ्या ओंकारनगर प्राथमिक शाळेला इनरव्हील क्लब ऑफ अहमदनगरच्या वतीने बागकामाचे विविध साहित्य भेट देण्यात आले. यामध्ये खुरपे, टिकाव, फावडे, कुऱ्हाड, पाण्याची झारी,पाइप,घमले, कंपोस्ट खत, भाजीपाला बियाणे इत्यादी साहित्याचा समावेश आहे.

यावेळी इनरव्हील क्लब ऑफ अहमदनगरच्या अध्यक्षा मधुबाला चोरडिया, वैजयंती जोशी, कांता चंगेडिया, हेमा लुनिया, उल्का लुनिया, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा पल्लवी भुजबळ, उपाध्यक्षा दुर्गा घेवारे, सदस्य दिपाली साळवे, मुख्याध्यापक भाऊसाहेब कबाडी, सहशिक्षक शिवराज वाघमारे, सहशिक्षिका वृषाली गावडे यांची उपस्थिती होती.

ओंकारनगर शाळेचे मुख्याध्यापक भाऊसाहेब कबाडी, सहशिक्षक शिवराज वाघमारे, सहशिक्षिका वृषाली गावडे हे विद्यार्थ्यांना मदतीला घेऊन दरवर्षी शाळेतील परसबागेत विविध भाज्यांची लागवड करतात. त्यामुळे शहरी भागात असणाऱ्या ओंकारनगर शाळेतील विद्यार्थ्यांना विविध पालेभाज्यांची लागवड कशी करतात, त्यांची वाढ कशी होते, त्या भाज्या येण्यासाठी किती कालावधी लागतो, याची माहिती मिळते. तसेच शालेय परसबागेत होणाऱ्या भाज्या विद्यार्थ्यांच्या मध्यान्ह भोजनासाठी वापरण्यात येतात. विशेष म्हणजे शाळेतील इको क्लबचे विद्यार्थी या परसबागेला फुलवण्यासाठी आवश्यक सर्व कामे करतात. त्यामुळेच सलग दोन वेळा ओंकारनगर शाळेला शालेय परसबाग निर्मिती स्पर्धेत अहिल्यानगर शहरातून प्रथम क्रमांक मिळालेला आहे. यापुढेही शाळेला परसबागेत काम करण्यासाठी जे जे साहित्य लागेल ते आम्ही उपलब्ध करून देऊ. शाळेतील विविध उपक्रमांची आम्ही नेहमी माहिती घेत असतो. तसेच यापुढेही शाळेला आवश्यक साहित्यासह ग्रंथालय पुस्तके उपलब्ध करून देण्यात येतील, असे आश्वासन इनरव्हील क्लब ऑफ अहमदनगरच्या अध्यक्षा मधुबाला चोरडिया यांनी दिले. यावेळी वैजयंती जोशी, हेमा लुनिया यांनीही शाळेतील विद्यार्थी, स्वच्छ परिसर, विविध उपक्रम यांचे आपल्या मनोगतातून कौतुक केले.

सूत्रसंचालन भाऊसाहेब कबाडी यांनी केले. सहशिक्षक शिवराज वाघमारे यांनी आभार मानले.

# ऐतिहासिक वारसा जतनाच्या कार्याची दखल; थोरात यांना महाराष्ट्र गुणगौरव पुरस्कार जाहीर



नगर – महाराष्ट्रातील प्राचीन ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे उल्लेखनीय कार्य करणारे अहिल्यानगर येथील अतुल शेषराव थोरात यांना शिर्डी येथील बी द चेंज फाऊंडेशन यांच्या वतीने देण्यात येणारा महाराष्ट्र गुणगौरव पुरस्कार जाहीर झाला आहे.

महाराष्ट्राच्या विविध भागांत असलेल्या प्राचीन वास्तू, ऐतिहासिक किल्ले, मंदिरे, लेणी, पुरातन स्थळे तसेच त्यांच्याशी संबंधित इतिहास आणि लोकपरंपरा यांचा अभ्यास करून त्याची माहिती डिजिटल माध्यमातून सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे काम थोरात करीत आहेत. अनेक ऐतिहासिक व दुर्लक्षित स्थळांना भेटी देऊन तेथील उपलब्ध पुरावे, शिलालेख, वास्तू वैशिष्ट्ये आणि स्थानिकांकडून मिळणारी ऐतिहासिक माहिती यांच्या माध्यमातून ते इतिहास मांडण्याचा प्रयत्न करतात. आजच्या डिजिटल युगात महाराष्ट्राचा समृद्ध इतिहास आणि सांस्कृतिक वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी सोशल मीडिया व यूट्यूबच्या माध्यमातून त्यांचे सातत्यपूर्ण प्रयत्न सुरू आहेत. इतिहास केवळ पुस्तकांपुरता मर्यादित न राहता तो प्रत्यक्ष स्थळांच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहोचावा, हा त्यांच्या कार्यामागील प्रमुख उद्देश आहे.

या कार्याची दखल घेत बी द चेंज फाऊंडेशन शिर्डी यांच्या वतीने अतुल शेषराव थोरात यांची महाराष्ट्र गुणगौरव पुरस्कार २०२६साठी निवड करण्यात आली आहे. या पुरस्कारामुळे महाराष्ट्रातील ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा जतन व संवर्धनाच्या कार्याला निश्चितच प्रोत्साहन मिळणार आहे.

थोरात यांच्या या सन्मानाबद्दल इतिहासप्रेमी, सामाजिक, सांस्कृतिक तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदन करण्यात येत आहे. हा पुरस्कार समारंभ ६ सप्टेंबर रोजी शिर्डी येथे संपन्न होणार आहे.



रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई) पक्षाच्या शहर सचिवपदी राहुल ठोकळ व शहर संघटकपदी प्रकाश थोरात यांना नियुक्ती पत्र देताना शहरजिल्हा अध्यक्ष सुशांत म्हस्के समवेत पदाधिकारी.

# आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठांसह युवकांचा रिपाइं (गवई) पक्षात प्रवेश

## राहुल ठोकळ शहर सचिव, तर प्रकाश थोरात यांची शहर संघटकपदी नियुक्ती

नगर – रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई) पक्षात आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्यांसह युवकांनी प्रवेश केला. पक्षाचे शहरजिल्हा अध्यक्ष सुशांत म्हस्के यांनी नव्याने पक्षात दाखल झालेल्या कार्यकर्त्यांचे स्वागत करून त्यांचा सत्कार केला.

यावेळी पक्षाच्या संघटनात्मक विस्ताराला चालना देण्यासाठी महत्त्वाच्या नियुक्त्याही जाहीर करण्यात आल्या. राहुल ठोकळ यांची शहर सचिवपदी, तर प्रकाश थोरात यांची शहर संघटकपदी नियुक्ती करण्यात आली. यावेळी दानिश शेख, गुलाम शेख, विजय शिरसाठ, अजीम खान, लकी वाघमारे, शुभम ठोंबे, जमीर सय्यद, योहान चाबुकस्वार, जावेद सय्यद, अजीज शेख, हुसेन चौधरी, अमोल भालेराव, अजय पठारे, प्रदीप साळवे, विशांत थोरात, सचिन कणगरे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

रिपाइं (गवई) पक्षाच्या माध्यमातून सामाजिक न्याय, समता, बंधुता आणि संविधानिक मूल्यांच्या रक्षणासाठी सातत्याने काम करण्याचा निर्धार यावेळी कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

आंबेडकरी विचारधारा समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी युवकांची मोठी भूमिका असून, संघटन मजबूत करण्यासाठी सर्वांना सोबत घेऊन काम करण्याचे आवाहन उपस्थित पदाधिकाऱ्यांनी केले.

# विचार भारतीच्या 'गुलजारनामा' मैफलीने घेतला रसिकांच्या मनाचा ठाव




विचार भारती व चैतन्य फाउंडेशन आयोजित 'गुलजारनामा' या संगीत मैफिलीत गायक हृषीकेश रानडे व स्वप्नजा लेले यांनी रसिकांना मंत्रमुग्ध केले. यावेळी चित्रकार प्रमोद कांबळे यांनी गुलजार यांचे लाईव्ह रेखाचित्र रेखाटले.

नगर – स्वरांची नजाकत, शब्दांची तरलता आणि भावनांची हळुवार स्पंदने यांचा सुरेल मिलाफ अनुभवण्याची अनोखी पर्वणी नगरच्या दर्दी रसिकांना 'गुलजारनामा' या संगीत मैफिलीत लाभली. हिंदी चित्रपटसृष्टीतील ख्यातनाम संवेदनशील गीतकार, कवी, पटकथाकार आणि दिग्दर्शक गुलजार यांच्या अजरामर गाण्यांनी, गझल व शायरीच्या मैफलीने रसिकांच्या मनाचा ठाव घेत मंत्रमुग्ध केले. निमित्त होते अहिल्यानगरच्या विचार भारती व चैतन्य फाउंडेशन आयोजित 'गुलजारनामा' या ज्येष्ठ गीतकार गुलजार यांच्या कारकीर्दीवर आधारित संगीत मैफलीचे.

ज्येष्ठ गीतकार गुलजार यांचा नुकताच झालेल्या ९२ व्या वाढदिवसानिमित्त आरोही निर्मित झालेल्या या मैफलीत प्रसिद्ध गायक हृषिकेश रानडे व स्वप्नजा लेले यांनी गुलजार यांच्या गीतांमधील प्रेम, विरह, नात्यांची ऊब आणि जीवनातील भावछटा आपल्या मधुर स्वरांनी उलगडल्या. या मैफलीत बहारदार गीतांचे सादरीकरण व गुलझार यांच्या प्रसिद्ध कविता (नझ्म) आणि शायरीचे सादरीकरण प्रसिद्ध कवी गीतकार वैभव जोशी यांनी केले. या मैफलीचे निवेदन मिलिंद कुलकर्णी यांनी केले. ज्येष्ठ संगीत संयोजक अविनाश कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली वादकांनी गायकांना उत्कृष्ट संगीत साथ दिली. याचवेळी रंगमंचावर प्रसिद्ध चित्रकार प्रमोद कांबळे यांनी गुलजार यांचे लाईव्ह रेखाचित्र रेखाटून या मैफलीला अविस्मरणीय केले.

यावेळी महापालिकेचे आयुक्त यशवंत डांगे, महापौर ज्योती गाडे यांच्यासह उपस्थित विविध क्षेत्रातील मान्यवरांनी कार्यक्रमाचा मनमुराद आस्वाद घेतला. विचार भारतीचे माजी अध्यक्ष अरुण कुलकर्णी यांनी सर्वांचे स्वागत करून विचार भारतीच्या कार्याचा थोडक्यात गोषवार केला. विचार भारतीचे अध्यक्ष सुधीर लांडगे, रवींद्र मुळे, अनंत देसाई, मनोज झंवर, उदय भणगे, सुनील नागोरी, गिरीश अग्रवाल, गौतम मुनोत, अरविंद पारगावकर, मिलिंद गंधे, निनाद टिपुगडे यांनी कलाकारांचा सन्मान केला. तसेच राजेश झंवर, यश निंबाळकर, श्रेयस लहामगे, राहुल भगत, राहुल गांधी यांनी सहकार्य केले. चित्रकार प्रमोद कांबळे यांनी रेखाटलेले गुलजार यांचे चित्र गीतकार वैभव जोशी यांना भेट दिले.

# गाडगीळ पटांगणातून बोलेरो जीपची चोरी; गुन्हा दाखल

नगर – गाडगीळ पटांगण येथे पार्क करून ठेवलेली बोलेरो जीप चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना २२ ऑगस्टला पहाटे घडली. याप्रकरणी सनी सोहनलाल सारवान (वय २९, रा. अंतिम चौक, नालेगाव) यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.

फिर्यादी सनी सारवान हे व्यवसाय करतात. सुमारे पाच महिन्यांपूर्वी त्यांनी जिल्हा परिषदेच्या वाहन लिलावातून महिंद्रा बोलेरो जीप खरेदी केली होती. सदर वाहन ते व्यावसायिक कामासाठी वापरत होते. सारवान यांनी २१ ऑगस्ट रोजी रात्री दहा वाजता त्यांची जीप गाडगीळ पटांगण येथे पार्क केली होती. त्यानंतर ते घरी गेले. दुसऱ्या दिवशी, २२ ऑगस्ट रोजी सायंकाळी गाडगीळ पटांगण येथे वाहनाकडे गेले असता वाहन तेथे आढळून आले नाही.

त्यांनी परिसरात वाहनाचा शोध घेतला; मात्र वाहन मिळाले नाही. त्यानंतर त्यांनी गाडगीळ पटांगण परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले. त्यामध्ये २२ ऑगस्ट रोजी पहाटे ४ वाजून ७ मिनिटांनी अज्ञात व्यक्ती बोलेरो वाहन सुरू करून अमरधामच्या दिशेने घेऊन जात असल्याचे दिसून आले. याबाबत त्यांनी दिलेल्या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या वतीने आयोजित रिटेल क्रेडिट आउटरीच कार्यक्रमात २१ कोटी रुपयांचे कर्जाचे वितरण

नगर – सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या रिटेल क्रेडिट आउटरीच प्रोग्राम अंतर्गत सेंट्रल बँक ऑफ इंडिया अहिल्यानगर क्षेत्रीय कार्यालयाच्या वतीने रिटेल क्रेडिट आऊट्रीच कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बँकेच्या विविध रिटेल कर्ज योजनांची माहिती देऊन ग्राहकांना २१ कोटी रुपयांच्या कर्जाच्या मंजुरी पत्रांचे वाटप करण्यात आले.



सेंट्रल बँक ऑफ इंडिया अहिल्यानगर क्षेत्रीय कार्यालयाच्या वतीने रिटेल क्रेडिट आऊट्रीच कॅम्पचे दीप प्रज्वलनाने उद्घाटन करण्यात आले. (छाया : समीर मन्यार)

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे क्षेत्रीय प्रबंधक नरेशकुमार दुबे होते. याप्रसंगी क्रेडाईचे उपाध्यक्ष प्रसाद आंधळे, उद्योजक गोविंद वाघ, सामाजिक वनीकरणाचे अमोल जाधव, विखे पाटील कॉलेज आयटी विभागाचे एचओडी दीपक विधाते, विखे पाटील कृषी महाविद्यालयाचे प्रा. डॉ. सोमेश्वर राऊत, मुख्य प्रबंधक संजय कराड, संदीप काळे, प्रशांत जाणघेल आदींसह सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे ग्राहक बँकेचे सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आंधळे म्हणाले, सेंट्रल बँक ऑफ इंडिया ही सर्वसामान्य ग्राहकांच्या हक्काची पसंतीची स्वदेशी बँक आहे. शेतकरी, शेतीपूरक उद्योग, उद्योजक, लघुउद्योजक, शिक्षणासाठी उच्च स्वप्न पाहणाऱ्या विद्यार्थ्यापासून सर्वसामान्य नागरिकांचे घरापासून ते गाड्यापर्यंतचे स्वप्न साकार करणारी सेंट्रल बँक ऑफ इंडिया ही सर्वसामान्यांच्या हक्काची बँक आहे. ग्राहकांना उत्कृष्ट आणि सुलभ आर्थिक उत्पादनांची सेवा देण्याच्या उद्देशाने सेंट्रल बँक ऑफ इंडियातर्फे वेळोवेळी ग्राहकांच्या सेवेसाठी कॅम्पचे आयोजन केले जाते. सेंट्रल बँक शेतकरी, गोरगरीब आणि सर्वसामान्यांच्या हितासाठी ग्रामीण भागात खऱ्या अर्थाने काम करत आहे. ग्रामीण विकासात सेंट्रल बँकेचा मोठा वाटा आहे, असे त्यांनी सांगितले.

नरेशकुमार दुबे म्हणाले, प्रत्येक कुटुंबाचे स्वतःचे घर, गाडी आणि मुलांच्या उच्च शिक्षणाचे स्वप्न असते. हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या माध्यमातून रिटेल कर्जाच्या सोप्या आणि सुलभ योजना उपलब्ध करून देत आहे. आमचे उद्दिष्ट अत्यंत पारदर्शक, जलद व वेळेत ग्राहकांपर्यंत कर्ज सेवा पोहोचवणे आहे, असेही ते म्हणाले.

सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे क्षेत्रीय कार्यालयाचे प्रबंध सागर तनपुरे यांनी गृह कर्ज, वाहन कर्ज, सोनेतारण कर्ज, शैक्षणिक कर्ज अशा विविध कर्जाची ग्राहकांना पीपीटीद्वारे सविस्तर माहिती दिली. डॉ. सोमेश्वर राऊत, गोविंद वाघ, दीपक विधाते यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन प्रमोद दहिफळे यांनी केले.

# माझे रेशीम माझा अभिमान २.० अभियानाअंतर्गत शास्त्रीय रेशीम शेती जनजागृती व तंत्रज्ञान प्रात्यक्षिक

नगर – माझे रेशीम माझा अभिमान २.० अभियानांतर्गत रेशीम उद्योग जनजागृती व तंत्रज्ञान प्रात्यक्षिक कार्यक्रमाचे आयोजन अहिल्यानगर जिल्ह्यातील नेवासा तालुक्यातील खुनेगाव येथे करण्यात आले. या कार्यक्रमास केंद्रीय रेशीम मंडळाचे शास्त्रज्ञ, राज्य रेशीम विभागाचे अधिकारी, एनजीओ प्रतिनिधी तसेच प्रगतिशील रेशीम उत्पादक शेतकरी अशा सुमारे ४० सहभागींची उपस्थिती होती.

या कार्यक्रमाचे आयोजन जिल्हा रेशीम अधिकारी संदीप एम. अगवणे, शास्त्रज्ञ डॉ. करण एस., ॲड. विवेक लगड पाटील, ओम गुरुदेव एंटरप्रायजेस, रेशीम उद्योग निविष्ठा वितरक आणि मुक्ताई प्रतिष्ठान, स्वयंसेवी संस्थेचे प्रा. हर्षल आगळे यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले. अर्ध–पक्क्या रेशीम कीटक संगोपनगृहाच्या निर्जंतुकीकरणाचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक घेण्यात आले. निरोगी रेशीम कीटक संगोपनासाठी योग्य स्वच्छता व निर्जंतुकीकरणाचे महत्त्व यावेळी स्पष्ट करण्यात आले. तसेच उत्पादनक्षमता व कोषाची गुणवत्ता वाढविण्यासाठी सुधारित तुतीच्या वाणांची तसेच बायव्होल्टाईन डबल हायब्रीड रेशीम कीटक प्रजातींची शेतकऱ्यांना माहिती देण्यात आली. रेशीम कीटक संगोपनासाठी शास्त्रीय पद्धतीने विकसित केलेल्या संगोपनगृहाचा अवलंब आणि योग्य संगोपन परिस्थिती राखण्याचे महत्त्व यावरही मार्गदर्शन करण्यात आले. प्रगतिशील रेशीम उत्पादक शेतकऱ्यांनी रेशीम उद्योगातील आपले अनुभव, प्रत्यक्ष क्षेत्रातील अडचणी तसेच भेडसावणाऱ्या विविध समस्यांची माहिती मांडली. शेतकऱ्यांसोबत परस्परसंवादी चर्चा सत्र घेण्यात आले. यामध्ये त्यांच्या प्रत्यक्ष क्षेत्रीय गरजांनुसार केंद्रीय रेशीम मंडळाने विकसित केलेली तंत्रज्ञाने आणि योग्य तांत्रिक उपाययोजना सुचविण्यात आल्या. तसेच उझी माशीच्या एकात्मिक कीड व्यवस्थापनाचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक घेण्यात आले. यामध्ये उझी माशीच्या प्रादुर्भावास प्रतिबंध करण्यासाठी प्रतिबंधात्मक व शास्त्रीय व्यवस्थापन पद्धतींवर विशेष भर देण्यात आला.

या कार्यक्रमामुळे शास्त्रज्ञ, शासकीय अधिकारी आणि शेतकरी यांच्यात थेट संवादासाठी प्रभावी व्यासपीठ उपलब्ध झाले. माझे रेशीम. माझा अभिमान २.० अभियानांतर्गत अहिल्यानगर जिल्ह्यातील रेशीम उद्योगाची उत्पादकता व शाश्वतता वाढविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान आणि शास्त्रीय पद्धतींचा अवलंब करण्यास शेतकऱ्यांना प्रोत्साहन मिळाले.



जिल्हा परिषद शिक्षण विभागातून प्रदीर्घ सेवेनंतर निवृत्त झालेले श्रीकांत ढगे यांचा सन्मान करताना बाजीराव गवारे व इतर मान्यवर.

# सेवापूर्तीनिमित्त श्रीकांत ढगे यांचा गौरव

नगर – जिल्हा परिषद शिक्षण विभागातील प्रदीर्घ शासकीय सेवा यशस्वीपणे पूर्ण करून सेवानिवृत्त झालेले कर्मचारी श्रीकांत उत्तम ढगे यांचा सेवापूर्ती सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. शासकीय सेवेत कर्तव्यनिष्ठेने जबाबदारी पार पाडतानाच सामाजिक बांधिलकी जपत विविध समाजोपयोगी उपक्रमांत योगदान दिल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते त्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी सभापती, अर्थ व बांधकाम समितीचे बाजीराव गवारे होते. यावेळी अहिल्यानगरचे प्रथम महापौर भगवान फुलसौंदर, ए.डी.सी.सी. बँकेचे माजी उपाध्यक्ष संपतराव म्हस्के, मार्केट कमिटीचे माजी सभापती बाबासाहेब गुंजाळ, माजी पंचायत समिती सदस्य पोपटराव निमसे तसेच माजी जिल्हा परिषद सदस्य संदेश कार्ले यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

यावेळी जिल्हा परिषद शिक्षण विभागातील अधिकारी व कर्मचारी, टाकळी काझी, पिंपळगाव माळवी तसेच सारसनगर परिसरातील ग्रामस्थ, मित्रपरिवार आणि नातेवाईक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदीप गुंजाळ, समीर गुंजाळ व विजय साबळे यांनी केले. शेवटी श्रीकांत ढगे यांनी आभार मानले.

# देशभक्तीपर समूह नृत्य स्पर्धेत स्ट्रॉबेरीच्या विद्यार्थ्यांनी पटकावला द्वितीय क्रमांक

नगर – समृद्धी वुमन्स मल्टीपर्पज सोसायटी संचलित भुतकरवाडी येथील स्ट्रॉबेरी लिटिल स्टार प्री–प्रायमरी शाळेच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर समूह नृत्य स्पर्धेत लहान गटात द्वितीय क्रमांक पटकाविला.

माय भारत, जिल्हा क्रीडा कार्यालय आणि उडाण फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या स्पर्धेत शहरातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला होता. या स्पर्धेत स्ट्रॉबेरी लिटिल स्टार प्री–प्रायमरी शाळेच्या विद्यार्थ्यांनी बुमरो या गाण्यावर आकर्षक देशभक्तीपर नृत्य सादर केले. नृत्याच्या माध्यमातून मिशन सिंदूरमधील विविध प्रसंग प्रभावीपणे साकारण्यात आले. चिमुकल्या विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास, नृत्यातील समन्वय, देशभक्तीची भावना आणि सादरीकरणातील उत्साह यामुळे त्यांच्या नृत्याला उपस्थितांकडून उत्स्फूर्त दाद मिळाली.



देशभक्तीपर समूह नृत्य स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावलेल्या चिमुकल्यांसमवेत स्ट्रॉबेरी स्कूलच्या मुख्याध्यापिका व शिक्षिका.

चिमुकल्या विद्यार्थ्यांनी अत्यंत आत्मविश्वासाने केलेले नृत्यसादरीकरण हे या स्पर्धेचे विशेष आकर्षण ठरले. गाण्याच्या तालावर अचूक पावले, आकर्षक हालचाली आणि मिशन सिंदूरचा आशय प्रभावीपणे मांडत विद्यार्थ्यांनी देशप्रेमाची भावना जागविली. त्यांच्या या उल्लेखनीय सादरीकरणास द्वितीय क्रमांक जाहीर करण्यात आला. या उल्लेखनीय यशाबद्दल शाळेच्या मुख्याध्यापिका स्वाती डोमकावळे, शालेय शिक्षिका धनश्री काळे (नृत्यदिग्दर्शिका), सविता सब्बन, सायली गायकवाड, शिल्पा भगत आणि समृद्धी डोमकावळे यांचा पाहुण्यांच्या हस्ते प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून आंतरराष्ट्रीय कुस्तीपटू शबनम शेख, ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. प्रशांत साळुंके, मेहेरबाबा संस्थेचे विश्वस्त मेहेरनाथ कलचुरी, विशेष सरकारी वकील ॲड. सुरेश लगड, जय असोसिएशन ऑफ एनजीओचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष ॲड. महेश शिंदे, जयश्री शिंदे, उडाण फाउंडेशनच्या अध्यक्षा आरती शिंदे आदी उपस्थित होते.

स्पर्धेत स्ट्रॉबेरी लिटिल स्टार प्री–प्रायमरी शाळेचे आदित्य गायकवाड, हर्ष वाघमोडे, आदित्य पारखे, शंकरषण चोपडे, निमिष साबळे, श्रद्धा गिते, नाविन्या काटे, रिद्धी भाळके, शिवन्या थोरवे, खुशी निकाळजे, आरुष पाडोळे, वरद सब्बन, ईशान सब्बन आणि अयंश गायकवाड या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

# गणेशोत्सवापूर्वी प्लास्टिकच्या फुलांच्या विक्री–वापरावर निर्बंध घाला

## महानगरपालिका आयुक्तांकडे कागद, काच, पत्रा कष्टकरी पंचायतचे निवेदन

नगर – आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर शहरात प्लास्टिक व कृत्रिम फुलांची विक्री, वापर आणि वितरण यावर लागू कायदे व शासनाच्या निर्देशांनुसार आवश्यक ती बंदी अथवा निर्बंधात्मक कार्यवाही करावी. तसेच नैसर्गिक फुलांचे उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांचे संरक्षण करण्यासाठी विशेष उपाययोजना व जनजागृती मोहीम राबवावी, अशी मागणी कागद, काच, पत्रा कष्टकरी पंचायत यांच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात पंचायतचे जिल्हा समन्वयक विकास भाऊसाहेब उडानशिवे यांनी अहिल्यानगर महानगरपालिका आयुक्तांना निवेदन देऊन गणेशोत्सव सुरू होण्यापूर्वीच आवश्यक प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्याची मागणी केली आहे.

गणेशोत्सव हा श्रद्धा, संस्कृती आणि सामाजिक एकतेचा उत्सव असला तरी तो पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करणे हीदेखील सामूहिक जबाबदारी आहे. गणेशोत्सवाच्या काळात शहरात मोठ्या प्रमाणात सजावट, धार्मिक साहित्य आणि फुलांचा वापर केला जातो. आकर्षक, टिकाऊ आणि तुलनेने स्वस्त असल्यामुळे प्लास्टिक व कृत्रिम फुलांचा वापर वाढत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

प्लास्टिकची फुले वापरल्यानंतर निर्माण होणारा कचरा सहज विघटनशील नसल्यामुळे तो दीर्घकाळ पर्यावरणात राहू शकतो. हा कचरा इतर कचऱ्यामध्ये मिसळल्यास त्याचे वर्गीकरण, पुनर्वापर आणि शास्त्रीय पद्धतीने व्यवस्थापन करणे कठीण होते. तसेच असा कचरा जाळल्यास पर्यावरणास घातक धूर व प्रदूषण निर्माण होण्याची शक्यता असल्याने त्याच्या वापरावर नियंत्रण आवश्यक असल्याचे निवेदनकर्त्यांनी म्हटले आहे.

प्लास्टिकच्या फुलांच्या वाढत्या वापराचा परिणाम नैसर्गिक फुलांची शेती करणाऱ्या शेतकऱ्यांवर होण्याची शक्यता आहे. नैसर्गिक फुलांचे उत्पादन घेताना शेतकऱ्यांना जमीन, पाणी, बियाणे अथवा रोपे, खते, औषधे, मजुरी आणि वाहतूक यावर खर्च करावा लागतो. मात्र बाजारपेठेत स्वस्त कृत्रिम फुले मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाल्यास नैसर्गिक फुलांची मागणी कमी होऊन शेतकऱ्यांना योग्य बाजारभाव मिळण्यात अडचणी निर्माण होऊ शकतात.

गणेशोत्सव सुरू झाल्यानंतर कारवाई करण्यापेक्षा त्यापूर्वीच व्यापारी, गणेश मंडळे, धार्मिक संस्था आणि नागरिकांमध्ये जनजागृती करणे अधिक परिणामकारक ठरेल. त्यामुळे प्लास्टिकच्या फुलांची विक्री व वितरण करणारी दुकाने, बाजारपेठा आणि व्यावसायिक ठिकाणांची विशेष तपासणी करून लागू नियमांनुसार आवश्यक ती कार्यवाही करावी, अशी मागणी आहे.

व्यापाऱ्यांना लागू नियमांची माहिती देऊन त्यांचे पालन करण्याच्या सूचना द्याव्यात. तसेच गणेश मंडळांना प्लास्टिकच्या फुलांचा वापर टाळून नैसर्गिक फुले, कागदी फुले, कापडी फुले आणि अन्य पर्यावरणपूरक सजावटीच्या साहित्याचा वापर करण्याचे आवाहन करावे, असेही निवेदनात म्हटले आहे.

महानगरपालिकेच्या माध्यमातून 'प्लास्टिकची फुले टाळाशेतकरी वाचवा, पर्यावरण वाचवा' ही विशेष जनजागृती मोहीम राबवावी. अधिकृत समाजमाध्यमे, संकेतस्थळ, फलक, पोस्टर, पत्रके आणि जनजागृती वाहनांच्या माध्यमातून नागरिकांना पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेश देण्यात यावा, याशिवाय व्यापारी संघटना, गणेश मंडळे, शेतकरी प्रतिनिधी, सामाजिक संस्था आणि नागरिक यांच्या सहभागातून 'प्लास्टिकमुक्त व शेतकरी हिताचा गणेशोत्सव' अभियान राबवावे. स्थानिक फूल उत्पादक शेतकरी आणि गणेश मंडळांमध्ये समन्वय निर्माण करून नैसर्गिक फुलांना अधिक बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी महानगरपालिकेने पुढाकार घ्यावा, अशीही मागणी आहे.

# समर्पण चातुर्मासात २८ ऑगस्टला होणार रक्षाबंधन

नगर – बहिण भावाच्या पवित्र नात्याची वीण घट्ट करणारा रक्षाबंधनाचा सण नारळी पौर्णिमेला २८ ऑगस्ट रोजी साजरा होत आहे. आनंदधाम परिसरात सुरू असलेल्या उपाध्याय प्रविणऋषी म.सा. यांच्या समर्पण चातुर्मास २०२६ मध्येही शुक्रवारी सकाळी ८.४५ ते ११ यावेळेत रक्षाबंधन साजरे केले जाणार आहे. यानिमित्त विविध स्पर्धा आणि लकी ड्रॉचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती समर्पण चातुर्मास कमिटीचे अध्यक्ष अशोक (बाबूशेठ) बोरा, महामंत्री आदेश चंगेडिया, कोषाध्यक्ष विलास कटारिया यांनी दिली.

महाराष्ट्र प्रवर्तक पूज्य कुंदनऋषी म.सा., उपाध्याय प्रविणऋषी म.सा., आलोकऋषी म.सा., तिर्थेशऋषी म.सा. सत्यप्रभा म.सा., अमितज्योती म.सा. आदी साधू साध्वीजींच्या सान्निध्यात आनंद तीर्थ समवशरण येथे हा कार्यक्रम होईल. समर्पण चातुर्मास २०२६ चे मुख्य लाभार्थी सौरभ बोरा, राखी सौरभ बोरा, प्रमिलाताई हेमराज बोरा, पराग बोरा व बोरा परिवार आहे. कार्यक्रमानंतर बोरा परिवारातर्फे सर्वांसाठी भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे.

शुक्रवारी सकाळी ८.४५ ते ११ यावेळेत रक्षाबंधन कार्यक्रम होणार आहे. रक्षा बंधनाचे पवित्र अनुष्ठान यावर्षी एकत्रच नारळी पौर्णिमेला करायचे आहे. या कार्यक्रमानिमित्त बेस्ट थाली, बेस्ट राखी, बेस्ट मेहंदी, बेस्ट भाई बहन जोडी या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. प्रथम तीन विजेत्यांना आकर्षक बक्षीस दिले जाईल. याशिवाय लकी ड्रॉ द्वारे ११ भाग्यवान विजेत्यांना चांदीची राखी भेट दिली जाईल. तसेच उपस्थित सर्व महिलांना विशेष सन्मान उपहार देण्यात येईल.

या पावन पर्युषण पर्वातील रक्षाबंधन कार्यक्रमास श्रावक श्राविकांनी सहपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन समर्पण चातुर्मास कमिटीचे अध्यक्ष अशोक (बाबूशेठ) बोरा, महामंत्री आदेश चंगेडिया, कार्याध्यक्ष राजेश भंडारी, कोषाध्यक्ष विलास कटारिया, उपाध्यक्ष अनिल पोखरणा, राजकुमार बोरा, विजय गुगळे, सुरेश कांकरिया, सचिन देसरडा, मनसुख गुंदेचा, सहसचिव अभय गांधी, अभिजीत गांधी, कमिटीचे सदस्य, सौरभ बोरा मित्र परिवाराने केले आहे.

# मृद व जलसंधारण सप्ताहात भाग्योदय विद्यालयात विविध उपक्रमांचा जागर

नगर – माती आणि पाण्याचे संवर्धन ही काळाची गरज असून, भविष्यातील पिढीचे जीवन सुरक्षित आणि समृद्ध करण्यासाठी प्रत्येकाने मृद व जलसंधारणाच्या कामात सहभागी झाले पाहिजे. विद्यार्थ्यांनी पाणी वाचविण्याची आणि पर्यावरण संवर्धनाची चळवळ घराघरापर्यंत पोहोचवावी, असे आवाहन जलसंधारण विभागाचे कार्यकारी अभियंता पांडुरंग गायसमुद्र यांनी केले.



भाग्योदय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने जल व मृसंधारणाच्या जनजागृतीसाठी महावॉकेथॉनमध्ये सहभागी होत रॅली काढली.

भाग्योदय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात मृद व जलसंधारण सप्ताहानिमित्त विविध जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये वृक्षदिंडी, जनजागृती रॅली, निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, पाण्यासाठी चालणे, रील्स ऑफ चॅलेंज आदी उपक्रमांचा समावेश होता. या उपक्रमांना विद्यार्थी–विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमास जलसंधारण विभागाचे कार्यकारी अभियंता पांडुरंग गायसमुद्र, जिल्हा समन्वयक शिंदे, प्राचार्य ज्ञानदेव बेरड, मुख्याध्यापक बन्सी नरवडे, प्रा. एकनाथ होले, डॉ. गोविंद कदम आदी उपस्थित होते.

मार्गदर्शन करताना पांडुरंग गायसमुद्र म्हणाले, शासनाच्या वतीने मृद व जलसंधारणाचे महत्त्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी शालेय स्तरावर विविध स्पर्धा व जनजागृतीपर उपक्रम राबविले जात आहेत. या उपक्रमांतील विजेत्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र, ट्रॉफी, टी–शर्ट व कॅपचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांनी पाणी वाया जाऊ न देणे, वृक्षारोपण करून झाडांचे संगोपन करणे, प्लास्टिकचा वापर कमी करणे तसेच पावसाचे पाणी साठविण्याबाबत आपल्या कुटुंबात व गावात जनजागृती करणे आवश्यक आहे. पाणी बचतीची चळवळ घराघरापर्यंत पोहोचविण्यात विद्यार्थ्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे, असे त्यांनी सांगितले.

प्राचार्य ज्ञानदेव बेरड यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. कोतकर बाबासाहेब यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी गोरक्ष कांडेकर, दत्तात्रय पांडुळे, सोपान तोडमल, धनंजय बारगळ, संतोष काकडे, शिवाजी धस, आदिनाथ ठुबे, गणेश गायकवाड, सुधाकर गायकवाड, बाळासाहेब कावरे आदींनी परिश्रम घेतले.

## चित्रा टॉकीजजवळ जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा

नगर – नगर शहरातील चित्रा टॉकीजजवळील गांधी मैदान परिसरात सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर पोलिसांनी २३ ऑगस्ट रोजी दुपारी छापा टाकला. या कारवाईत पोलिसांनी एका इसमाला ताब्यात घेत त्याच्याकडून ११३० रुपयांची रोख रक्कम आणि सोरट जुगाराचे साहित्य जप्त केले आहे.

कोतवाली पोलीस स्टेशनचे पथक पेट्रोलिंग करत असताना चित्रा टॉकीजजवळ गांधी मैदानात एक इसम लोकांकडून पैसे घेऊन त्यांना चिट्ठ्या काढून देत सोरट नावाचा हारजितीचा जुगार खेळवत असल्याची गुप्त माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी पंचांसमक्ष तात्काळ त्याठिकाणी छापा टाकला. या कारवाईदरम्यान पळून जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या लोकेश राजेंद्र आडेप (वय २८, रा. सातभाई गल्ली, अतिश अपार्टमेंट, अहिल्यानगर) याला पोलिसांनी जागेवरच पकडले. झडती घेतली असता त्याच्याकडे जुगाराचे साहित्य व रोख रक्कम आढळून आली. या प्रकरणी पो. कॉ. शिरीष तरटे यांच्या फिर्यादी वरून लोकेश आडेप विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# वसतिगृहातील मूलभूत सुविधांसाठी सम्यक विद्यार्थी आंदोलनचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

नगर – अहिल्यानगर जिल्ह्यातील शासकीय वसतिगृहांमध्ये आदिवासी विद्यार्थ्यांना मूलभूत सुविधा मिळाव्यात, त्यांचे आरोग्य जपले जावे आणि त्यांच्या शैक्षणिक हक्कांचे संरक्षण व्हावे, अशा विविध मागण्यांचे निवेदन वंचित बहुजन आघाडी प्रणित सम्यक विद्यार्थी आंदोलन यांच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले.



अहिल्यानगर जिल्ह्यातील शासकीय वसतिगृहांमध्ये आदिवासी विद्यार्थ्यांना मूलभूत सुविधा मिळाव्यात, त्यांचे आरोग्य जपले जावे आणि त्यांच्या शैक्षणिक हक्कांचे संरक्षण व्हावे, अशा विविध मागण्यांचे निवेदन वंचित बहुजन आघाडी प्रणित सम्यक विद्यार्थी आंदोलन यांच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले.

वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष योगेश साठे यांच्या नेतृत्वाखाली निवासी उपजिल्हाधिकारी दिलेल्या निवेदनातून पाच प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत. त्यात गडचिरोली येथील आश्रमशाळेतील मृत विद्यार्थिनींच्या कुटुंबीयांना प्रत्येकी १ कोटी आर्थिक मदत द्यावी, महाराष्ट्रातील सर्व आदिवासी विद्यार्थी वसतिगृहे व आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांसाठी आरोग्य विमा योजना लागू करावी, तसेच प्रत्येक विद्यार्थ्याला आपत्कालीन परिस्थितीत तातडीची व मोफत वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून द्यावी, अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व आदिवासी विद्यार्थी वसतिगृहांची तातडीने प्रत्यक्ष पाहणी करून स्वच्छ पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, वीज, सुरक्षित इमारत, पौष्टिक भोजन आणि आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. आदिवासी विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी विशेष उपाययोजना कराव्यात. आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हक्कांचे संरक्षण करून प्रलंबित शिष्यवृत्ती व शासकीय योजनांचा लाभ वेळेत द्यावा तसेच प्रत्येक वसतिगृहात अभ्यासिका, वाचनालय, संगणक व इंटरनेटसारख्या आवश्यक शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशा मागण्या या निवेदनातून करण्यात आल्या आहेत.

यावेळी वंचित बहुजन आघाडी प्रणित सम्यक विद्यार्थी आंदोलन अहिल्यानगरचे जिल्हाध्यक्ष अजित कुऱ्हाडे, उपजिल्हाध्यक्ष रियाज शेख, जिल्हा संघटक प्रतीक ठोकळ, जिल्हा महासचिव विवेक कसबे, संपर्क प्रमुख प्रसाद कांबळे, सदस्य अजिंक्य जगताप, सदस्य अनिकेत भिंगारदिवे, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा सल्लागार जे. डी. शिरसाठ, भिंगार शहराध्यक्ष राजीव भिंगारदिवे, नगर तालुकाध्यक्ष रविकिरण जाधव, युवा शहराध्यक्ष ॲड. योगेश गुंजाळ, शहर महासचिव अमर निरभवने, आंद्रेश पहिलवान, सुरेश पानपाटील, अविनाश धनवे, सुशील साळवे, देविदास भालेराव उपस्थित होते.

# एक फोन आला आणि...

जयपूरमधील पंचतारांकित हॉटेलमध्ये लग्नाची जोरदार तयारी सुरु होती. बँडच्या तालावर वऱ्हाडी नाचत होते. पंडीत लग्नाचे मंत्र म्हणत होते. वधू वर सप्तपदीसाठी आले अन् तेवढ्यात वराला फोन आला. त्यानंतर वधूला मंडपातच सोडून वराने धूम ठोकली.

गेल्या अनेक दिवसांपासून अंमलबजावणी संचालनालय (ईडी) वराच्या शोधात होते. प्रसिद्ध महादेव बेटिंग ॲप प्रकरणातील सौरभ आहुजा म्हणजेच हा वर होता. 'ईडी'ला आरोपी सौरभ गुप्तपणे लग्न करत असल्याचे कळले होते. ही माहिती मिळतातच त्याला पकडण्यासाठी 'ईडी'ने योजना आखली. लग्नाच्या दिवशी छापा टाकून सौरभ आहुजाला पकडण्याचे ठरले.' ईडी'ला लग्नाच्या विधींनंतर सौरभ आहुजाला पकडायचे होते. पण सौरभला 'ईडी'च्या योजनेबद्दल कळले. 'ईडी'च्या तावडीत सापडण्यापूर्वी सौरभ मध्येच मंडपातून वधूला सोडून पळून गेला.

लग्नाच्या विधींपूर्वी सौरभ पळून गेल्याने त्याची वधू आणि इतर पाहुणे आश्चर्यचकित झाले. त्यांना नेमके काय घडले याबद्दल काही समजत नव्हते; पण 'ईडी'ने लग्नाला आलेल्या त्याच प्रकरणातील आरोपी प्रणवेंद्रसह तीन जणांना पकडताच सर्वांना या प्रकरणाची माहिती समजली आणि सौरभबद्दल सगळे सत्य समोर आले. नंतर 'ईडी' अधिकाऱ्यांनी वधूचीही चौकशी केली; पण त्यांच्या हाती काही लागले नाही. एवढेच नाही तर 'ईडी'ने वधू आणि वर दोघांच्याही कुटुंबांकडून माहिती गोळा केली असून ते सौरभच्या शोधात आहेत.




मिळालेल्या माहितीनुसार, भारतातील सर्वात मोठ्या ऑनलाइन बेटिंग प्लॅटफॉर्मपैकी एक असलेल्या महादेव बेटिंग ॲपद्वारे कोट्यवधी रुपयांच्या बेकायदेशीर व्यवहारासंदर्भात रायपूर अंमलबजावणी संचालनालयाचे पथक जयपूरला पोहोचले होते. तिथे त्यांनी आरोपी सौरभ आहुजा याला पकडण्यासाठी छापा टाकला; पण 'ईडी' अधिकाऱ्यांना चुकवून आरोपीने मंडपातून पळ काढला. भोपाळचा रहिवासी असलेल्या आरोपी सौरभ आहुजाच्या कुटुंबाने रायपूरमधील मुख्य आरोपीच्या दुबईतील लग्नाच्या पार्टीसाठी विमान बुक करण्यात भूमिका बजावली. त्यानंतर रायपूर 'ईडी'ची टीम सौरभ आहुजाच्या मागे लागली. पण 'ईडी'ला सौरभ स्वतःच्या लग्नासाठी जयपूरला पोहोचला असल्याची माहिती मिळाली तेव्हा 'ईडी'चे अधिकारीही त्याच्या मागे लागले. यानंतर 'ईडी'चे अधिकारी पूर्ण तयारीने आहुजा कुटुंब जिथे राहत असलेल्या हॉटेलमध्ये पोहोचले. तरीही सौरभने 'ईडी' अधिकाऱ्यांना चकवा दिला. पण 'ईडी'ने इतर तीन आरोपींना अटक केली असून त्यांना विमानाने रायपूरला नेले आहे.

## कॅलिडोस्कोप

# आधी मार, मग मान !

मध्यरात्रीची वेळ होती. एका तरुणाने चोरून घरात प्रवेश केला. अचानक दिवे लागले आणि घरातील लोक जागे झाले. त्या तरुणाला पाहताच त्यांनी 'चोर-चोर' असे ओरडून त्याला मारहाण केली. तो तरुण म्हणू लागला, 'एकदा माझे ऐका.' मग त्याने स्वतःबद्दल असे काही सांगितले, की दुसऱ्या दिवशी सकाळी कुटुंबाने त्याला त्यांचा जावई बनवले. आता या लग्नाची सर्वत्र चर्चा होत आहे.

ही घटना उत्तर प्रदेशातील जौनपूर येथील आहे. खरे तर ज्या घरात तो तरुण शिरला होता तिथे त्याची मैत्रीण राहत होती. तो मध्यरात्री त्याच्या प्रेयसीला भेटण्यासाठी पोहोचला होता. पण नशीब वाईट होते. प्रेयसीच्या कुटुंबाने त्याला चोर समजून मारहाण केली. नंतर मुलाने खरे सांगितले तेव्हा दुसऱ्या दिवशी कुटुंबाने त्याचे लग्न त्यांच्या मुलीशी लावून दिले. ही विचित्र घटना जसरापाटन पोलिस ठाण्याच्या हद्दीतील करीमपूर खुर्द गावातील आहे. पनौली गावात राहणारा विकास पासवान प्रेयसी रुबीच्या घरात तिला भेटण्यासाठी गुप्तपणे शिरला. रात्रीच्या अंधारात त्याला कोणीतरी पाहिले, चोर समजून आरडाओरडा केला. घरातील लोकही जागे झाले. त्यानंतर सर्वांनी मिळून विकासला पकडले आणि मारहाण केली.



पकडल्यानंतर तरुणाची चौकशी केली असता तो विकास पासवान असल्याचे समजले. तरुणाने आपण चोर नसून रुबीला भेटायला आल्याचे संगीतले. रुबीने तो आपला प्रियकर असल्याचे सांगितले. त्यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी त्यांचे लग्न झाले. आता या लग्नाची सर्वत्र चर्चा होत आहे.



# आता अनेक पतींना धास्ती!


महाराष्ट्रात काय देशभरात केतन अग्रवाल हत्या प्रकरण गाजतेय. केतन अग्रवाल हत्या प्रकरणात पोलिस तपासात जसाजसा पुढे जातोय, तसे धक्कादायक गौप्यस्फोट होत आहेत. केतन अग्रवालच्या हत्येमागे त्याची होणारी बायको सिया गोयल आणि तिचा बॉयफ्रेंड चेतन चौधरीला पोलिसांनी अटक केली. या घटनेनंतर अनेक जणांनी धास्ती घेतली आहे. याचे एक धक्कादायक प्रकरण समोर आलं आहे. बंगळुरूमधील एका व्यावसायिकाने त्यांच्या आयुष्यातील धक्कादायक वास्तव सांगितलं.

या व्यावसायिकाने सांगितले, की त्याच्या पत्नी आणि तिच्या प्रियकराकडून त्याला धमक्या येत आहेत. तो म्हणाला सिया गोयल प्रकरणामुळे तो भीतीखाली जगतोय. त्या व्यावसायिकाने असा आरोप केला, की माझी पत्नी आणि तिच्या बॉयफ्रेंडने मला धमकी देण्यासाठी एका माणसाला सुपारी दिली आहे. कारण मी घटस्फोटाचा अर्ज मागे घ्यावा, अशी त्यांची मागणी आहे. या गोष्टीसाठी माझ्यावर दबाव टाकला जातोय. त्या व्यावसायिकाने सांगितलं की, त्याने कोर्टात घटस्फोटासाठी अर्ज दाखल केला आहे. त्यासोबत त्यांनी पत्नीविरोधात गुन्हादेखील दाखल केला आहे. घटस्फोट आणि गुन्हा मागे घेण्यासाठी माझी पत्नी आणि तिचा बॉयफ्रेंड एका माणसाकडून धमक्या देत आहेत. दबाव टाकला जात आहे, असे ते म्हणाले.

या ३२ वर्षीय व्यावसायिकाने कोर्टात सांगितलं, की पत्नी आणि तिच्या प्रियकराकडून जीवाला धोका आहे. पुढे त्यांनी सांगितलं, की पुण्यातील लोहगडावरून सिया गोयलने जसं केतन अग्रवालला ढकलून दिलं होतं. त्यासाठी सियाने तिचा प्रियकर चेतन चौधरीची मदत घेतली. तसंच माझी बायको आणि तिच्या प्रियकर माझा काटा काढू शकतात, अशी भीती मला वाटते. त्यांनी कोर्टात सांगितलं, की दहा एप्रिलला मी कारने पाच वर्षांच्या मुलीसोबत जात असताना एका अज्ञात बाइकवरून आलेल्या व्यक्तीने कार थांबवली. त्यानंतर त्याने माझ्या कारच्या काचेला टकटक केलं. त्यानंतर मला धमक्या दिल्या. त्या माणसाला माझ्या पत्नी आणि तिच्या प्रियकराने पाठवलं होतं. त्याने मला धमकी दिली, की पोलिसात दिलेली तक्रार मागे घे नाहीतर चांगलं होणार नाही. या व्यावसायिकाचं २९ ऑक्टोबर २०२० मध्ये लग्न झालं आहे. त्यांना पाच वर्षांची मुलगी असून त्यांनी कोर्टात घटस्फोटासाठी अर्ज केला आहे.

# छेड काढणाऱ्याला भरल्या बांगड्या!

महाराष्ट्रातील अकोला जिल्ह्यातील महिलांच्या सुरक्षेशी संबंधित एक प्रकरण 'सोशल मीडिया'वर चर्चेचा विषय बनले आहे. धावत्या ट्रेनमध्ये एका तरुणीचा विनयभंग करणाऱ्या तरुणाला प्रवाशांनी एका अनोख्या पद्धतीने धडा शिकवला. त्याला मारहाण करण्याऐवजी त्यांनी त्याच्या हातात बांगड्या घालून आणि ओठांना रूज व लिपस्टिक लावून त्याला सर्वांसमोर अपमानित केले.



शेगाव ते बडनेरा दरम्यान भुसावळ-वर्धा पॅसेंजर मेमो ट्रेनमध्ये प्रवास करत असताना एका तरुणाने एका तरुणीवर लैंगिक अत्याचार करण्याचा प्रयत्न केला. घाबरण्याऐवजी, त्या तरुणीने तात्काळ त्याला जाब विचारला आणि खडसावले. तिचा आक्रोश ऐकून डब्यातील इतर प्रवासीही घटनास्थळी धावून आले. घटनेनंतर, त्या तरुणाला मारहाण करण्याऐवजी प्रवाशांनी वेगळ्याच प्रकारे निषेध नोंदवला. त्यांनी त्याच्या हातात बांगड्या घालून, चेहऱ्यावर रूज आणि ओठांना लिपस्टिक लावून त्याला सर्वांसमोर अपमानित केले. ट्रेनमधील एका प्रवाशाने ही संपूर्ण घटना मोबाईल फोनवर रेकॉर्ड केली. ती आता विविध 'सोशल मीडिया' प्लॅटफॉर्मवर मोठ्या प्रमाणावर शेअर केली जात आहे.

अनेकजण त्या तरुणीच्या धैर्याचे आणि प्रवाशांच्या सतर्कतेचे कौतुक करत आहेत, तर काहींच्या मते अशा प्रकरणांमध्ये कायदेशीर कारवाई आवश्यक आहे, जेणेकरून गुन्हेगारांवर कायद्यानुसार खटला चालवता येईल; मात्र या प्रकरणात पोलिसांकडून कोणतेही अधिकृत निवेदन किंवा कारवाईची पुष्टी करण्यात आलेली नाही.



# रोबो अडकले लग्नबंधनात!

चक्क रोबो वधू-वराने एकमेकांशी वचने घेतली आणि लग्नबंधनात बांधले अडकले. विज्ञान आणि कल्पनेच्या सीमारेषेवर उभे राहिलेले हे दृश्य पाहून कोणाचेच डोळे विस्फारले नाहीत तर नवल वाटेल.

रशियाची राजधानी मॉस्को येथे एक ऐतिहासिक क्षण घडला. मानवी लग्नसोहळ्यांची परंपरा तोडत दोन अत्याधुनिक रोबोजनी विवाह केला. हे केवळ प्रदर्शन नव्हते, तर यंत्रांमधील भावना आणि तंत्रज्ञान यांचा अनोखा मिलाफ होता. हे अनोखे लग्न मॉस्कोच्या प्रसिद्ध पुश्किन ग्रंथालयात पार पडले. वर रॉबर्ट हा कार्यालयीन कर्मचारी आणि ब्लॉगर म्हणून डिझाइन केला गेला आहे, तर वधू मटिल्डा एक ग्रेसफुल बॅलेरिना रोबोट आहे. दोघेही यापूर्वी सेंट पीटर्सबर्ग आंतरराष्ट्रीय आर्थिक मंचावर लक्ष वेधून गेले होते.

यशस्वी सिस्टम सिंक्रोनायझेशननंतर होस्ट मारिया पंत्युखिनाने दोघांना रोबोट पती-पत्नी म्हणून जाहीर केले. रॉबर्टने प्रत्येक वळणावर विश्वासू साथीदार राहण्याचे वचन दिले, तर मटिल्डाने त्याला सदैव प्रेरणा देण्याची शपथ घेतली. पाहुणे या दृश्याने थक्क झाले. समारंभात एक मजेदार ट्विस्ट आला. डॉगमॅटिक नावाच्या रोबो कुत्र्याने वधू-वरासाठी लग्नाच्या अंगठ्या आणल्या. दोघांनी त्या एकमेकांच्या बोटांमध्ये घातल्या. हा क्षण उपस्थित सर्वांना अविस्मरणीय ठरला. हे लग्न कायदेशीररित्या वैध नाही. कोणतीही अधिकृत नोंदणी झालेली नाही. हा पूर्णपणे प्रतिकात्मक सोहळा होता. तज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार अशा घटनांद्वारे रोबोटिक्सला मानवी जीवनाशी अधिक जवळीक साधता येऊ शकते.


# तीस सेंकदांमध्ये १९५ वेळा चुंबन!

एखादं जोडपं अवघ्या ३० सेकंदामध्ये शेकडो वेळा किस करू शकतं का? ऐकायला हे विचित्र वाटू शकतं; पण ब्राझीलमधल्या एका जोडप्याने हे खरंच करून दाखवलंय. ब्राझीलमधील एका डॉक्टर कपलने अनोखी कामगिरी करत 'गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड'मध्ये आपले नाव नोंदवले आहे. रेनाटो बायमा गैया आणि त्यांची जोडीदार नायारा रोबर्टा रिबेरो डी मारिन्स यांनी अवघ्या ३० सेकंदांमध्ये १९५ वेळा किस करून सर्वाधिक किस करण्याचा जागतिक विक्रम आपल्या नावावर केला.



'गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्स'च्या माहितीनुसार, या जोडप्याने ही कामगिरी 'इंटरनॅशनल किसिंग डे'च्या दिवशी केली. हा दिवस दरवर्षी ६ जुलै रोजी साजरा केला जातो. या दिवसाची सुरुवात ब्रिटनमध्ये झाली आणि नंतर जगातील अनेक देशांमध्ये तो साजरा केला जाऊ लागला.

रेनाटो बायमा गैया आणि नायारा रोबर्टा रिबेरो डी मारिन्स हे दोघेही व्यवसायाने डॉक्टर आहेत. कोरोना महामारीच्या काळात त्यांनी फ्रंटलाइन वर्कर म्हणून रुग्णांची सेवाही केली होती. वैद्यकीय क्षेत्रात काम करत असतानाच त्यांनी ही अनोखी कामगिरी करून जगाचे लक्ष वेधून घेतले आहे. ३२ वर्षीय रेनाटो आणि ३३ वर्षीय नायारा गेल्या सुमारे दीड वर्षांपासून रिलेशनशिपमध्ये आहेत. दोघांनी मिळून हा विक्रम करण्याचा निर्णय घेतला. त्यांना वाटत होते, की त्यांची जोडी ही या आव्हानासाठी योग्य आहे आणि त्यांनी ते यशस्वीपणे पूर्ण करून दाखवले. रेनाटो बायमा गैया यांच्यासाठी हा पहिलाच 'गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड' नाही.



# पृथ्वीवरची सर्वात खोल जागा

कॅलिफोर्निया विद्यापीठातल्या शास्त्रज्ञांनी अंटार्क्टिकाच्या डेनमान ग्लॅशियरजवळच्या जमिनीवर जगातली सर्वात खोल जागा शोधण्यात आली आहे. ही जागा समुद्रसपाटीपासून ३.५ किलोमीटर म्हणजेच ११,५०० फूट खोल आहे. अंटार्क्टिका खंडावर अनेक गुपितं दडली आहेत. ही गुपितं शास्त्रज्ञांनाही गोंधळात टाकतात, आश्चर्यचकित करतात. या प्रकल्पावर गेल्या सहा वर्षांपासून काम सुरू आहे. डेनमान ग्लॅशियर २० किलोमीटर रुंद आहे. या शोधातून जागतिक तापमानवाढीचे परिणाम समोर येत आहेत. बर्फ समुद्रसपाटीपासून ३५०० मीटर पेक्षाही खाली जाऊ लागला आहे. त्यामुळे येत्या काळात दक्षिण ध्रुवावर वेगळं चित्र पहायला मिळू शकतं. शास्त्रज्ञांनी शोधलेलं स्थान या पृथ्वीवरची सर्वात खोल जागा आहे. मात्र या जगातली सर्वात खोल जागा पॅसिफिक महासागराच्या पश्चिम भागात आहे. या भागाला 'मारियाना ट्रेंच' असं म्हटली जाते.

# संपत्ती केली बालमित्राच्या नावे


जगात बहुतांश लोक आपली संपत्ती, पैसा अडका, कमाई, दागिने आपले जवळचे नातेवाइक, वंशजांच्या नावावर करतात; पण १९ वर्षांचा एक तरुण त्याला अपवाद ठरला आहे. त्याने आपली सगळी संपत्ती बालपणीच्या मित्राच्या नावावर केली. चीनमध्ये राहणाऱ्या ली ने बालपणीच्या मित्रावर विश्वास दाखवला. या निर्णयामुळे ली चर्चेमध्ये आहे. त्याचं वय अवघं १९ वर्ष आहे. या वयात बहुतांश लोकांना शिक्षण, करिअर आणि भविष्याची चिंता असते; पण ली ला आपल्या मित्राची जास्त काळजी होती. ली चीनच्या शंघाई शहरात राहतो. त्याने जवळ २ कोटी युआन म्हणजे जवळपास २८ कोटी रुपयांची संपत्ती बालपणीच्या मित्राच्या नावावर केली. त्याने आपलं इच्छापत्र रजिस्टर केलं आहे. ली च्या प्रॉपर्टीमध्ये एक अपार्टमेंट आणि बँकेमध्ये जमा रक्कमेचा समावेश आहे.



ली ला एडवेंचर आणि एक्सट्रीम स्पोर्ट्सची आवड आहे. अशा खेळांमध्ये रिस्क जास्त असते. म्हणून त्याने ठरवले, की त्याच्यासोबत कुठली दुर्घटना घडली तर त्याची संपत्ती कोणाला मिळाली पाहिजे. आई-वडिलांच्या जोडीदाराला त्याच्या संपत्तीचा फायदा मिळू नये अशी त्याची इच्छा होती. त्याच्या आई-वडिलांचा घटस्फोट झाला आहे. दोघांनी पुन्हा नव्याने संसार थाटला आहे. ली चं त्याच्या आई-वडिलांच्या विद्यमान जोडीदारांना आपल्या कुटुंबाचा भाग मानत नाही. म्हणून त्याने सगळी संपत्ती मित्राच्या नावावर केली आहे. या मित्रावर त्याचा प्रचंड विश्वास आहे. चीनच्या उत्तराधिकारी कायद्यानुसार, एखादी व्यक्ती अविवाहित असेल, तिला मुलं नसतील, तर सामान्य परिस्थितीत आई-वडिल कायदेशीर उत्तराधिकारी ठरतात; पण कोणा व्यक्तीने कायदेशीरदृष्ट्या वैध इच्छापत्र तयार केलं, तर ती कुटुंबाबाहेर कोणाच्या नावावरही ती संपत्ती करु शकते. रिपोर्टनुसार, ली ने शंघाई येथील 'चायना विल रजिस्ट्रेशन सेंटर'मध्ये आपल्या इच्छापत्राची नोंदणी केली.

# सौंदी अरेबियातलं सुनसान शहर

अरबस्थानातला बराचसा भूभाग वाळवंटी आहे. या भागात इस्लाम धर्माचा प्रभाव आहे. या देशांमधले बहुसंख्य लोक इस्लामचे अनुयायी आहेत. मात्र इस्लामचा इतिहास फार जुना नाही. इस्लामच्या प्रभावाआधी या भागात इतर धर्म तसंच संस्कृती गुण्यागोविंदाने नांदत असत. यापैकीच एक संस्कृती म्हणजे नेबेतियन संस्कृती. सौदी अरेबियापासून पॅलेस्टाईनमधल्या गाझापट्टीपर्यंत नेबेतियन संस्कृतीचा प्रभाव होता. नेबेतियन लोक वाळूतून पाणी काढणं आणि त्याच्या संरक्षणाचं काम करत असत. भारत आणि पूर्व आशियातून युरोपमध्ये मसाल्यांची ने-आण होत असे. नेबेतियन लोक मसाला व्यापाऱ्यांकडून कर वसूल करत असत. अरबी देशांमध्ये आजही नेबेतियन संस्कृतीच्या खुणा आढळतात. त्या काळातली शहरं, वाडे तसंच इतर इमारतींचे अवशेष या भागात आजही पहायला मिळतात. जॉर्डन पेत्रा शहर खूपच प्रसिद्ध आहे. सौदी अरेबियातल्या मदैन सालेह या शहरात नेबेतियन संस्कृतीच्या खुणा आहेत. हे नेबेतियन संस्कृतीच्या काळातलं दुसऱ्या क्रमांकाचं सर्वात मोठं शहर होतं. युनेस्कोने या स्थानाला जागतिक वारसा यादीत स्थान दिलं आहे. हे शहर बिगरइस्लामी लोकांनी वसवलं होतं. आज या भागात कोणीही फिरकत नाही. मदैन सालेहच्या देदीप्यमान इतिहासाची ग्वाही देणाऱ्या इतिहासाच्या खुणा आजही इथे पहायला मिळतात. एके काळी गजबजलेलं हे शहर आज अगदीच सुनसान भासू लागलं आहे.



# रुग्णसेवेसाठी आनंदऋषीजी हॉस्पिटल विश्वास व श्रद्धेचे केंद्र

## सीए अशोक पितळे यांचे प्रतिपादन; मोफत अस्थिरोग तपासणी शिबिरात १३५ रुग्णांची तपासणी



आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे आयोजित मोफत अस्थिरोग तपासणी शिबिराचे उद्घाटन करताना सीए अशोक पितळे व मान्यवर.

नगर – रुग्णसेवेसाठी विश्वास व श्रद्धेचे केंद्र म्हणून आनंदऋषीजी हॉस्पिटलने नावलौकिक मिळवला आहे. प.पू. आनंदऋषीजी महाराजांच्या मानवसेवेच्या कार्याची पायाभरणी प.पू. आदर्शऋषीजी यांनी या हॉस्पिटलच्या उभारणीतून केली. जैन सोशल फेडरेशनचे सर्व सदस्य समर्पित भावनेने या कार्यात योगदान देत आहेत. रुग्णसेवेचे रोपटे आता वटवृक्षात बहरले असून, अनेक गरजू कुटुंबांना या सेवेच्या सावलीचा आधार मिळाला आहे, अशी भावना सीए अशोक पितळे यांनी व्यक्त केली.

जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटल ण्ड मेडिकल रिसर्च सेंटरच्या वतीने राष्ट्रसंत आचार्य श्री आनंदऋषिजी महाराज यांच्या १२६ व्या जयंतीनिमित्त सीए अशोक धनराज पितळे परिवाराच्या वतीने मोफत अस्थिरोग तपासणी, मणके व सांधेबदली शस्त्रक्रिया तसेच फिजिओथेरपी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी सीए अशोक पितळे बोलत होते. यावेळी सौ. निता पितळे, मनीष पितळे, सीए गौरव पितळे, आनंद पितळे, संतोष बोथरा, डॉ. वसंत कटारिया, सतीश लोढा, माणकचंद कटारिया, वसंत चोपडा, तज्ज्ञ डॉ. विशाल शिंदे, डॉ. रोहन धोत्रे, स्पाइन सर्जन डॉ. अमित सुराणा, डॉ. श्रीकांत दलाल, डॉ. भरत जगताप, डॉ. नितीन कुमार, डॉ. अभय साठे, डॉ. आराधना अखडे आदी उपस्थित होते.

पुढे सीए पितळे म्हणाले की, आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या सेवाकार्यात उद्योग–व्यवसाय सांभाळून अनेक कुटुंबे समर्पित भावनेने रुग्णसेवेशी जोडली गेली आहेत. त्यांची पुढील पिढीदेखील या कार्यात योगदान देत आहे. गरिबांना कमी खर्चात उपचार मिळावेत, हा रुग्णसेवेचा मापदंड घेऊन हॉस्पिटलमध्ये कार्य केले जात आहे. हॉस्पिटलच्या नेत्रालयाने राज्यात सर्वाधिक यशस्वी शस्त्रक्रिया करण्याचा मान मिळवला आहे. उपनगरातील नागरिकांसाठी तारकपूर येथेही सेंटर सुरू करण्यात आले असून, त्याचा लाभ सर्वसामान्यांना मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रास्ताविकात संतोष बोथरा म्हणाले की, शेवटच्या घटकेपर्यंत आरोग्यसेवा पोहोचविण्यासाठी ही सेवा सुरू झाली आहे. प्रत्येक सदस्य सद्भावनेने या कार्यात सहभाग देत आहे. राज्याच्या कानाकोपऱ्यातून रुग्ण या सेवेचा लाभ घेत आहेत. रुग्णसेवेचे प.पू. आदर्शऋषीजींचे स्वप्न या हॉस्पिटलच्या माध्यमातून साकारले गेले आहे. मानवसेवेचा विडा उचलून रुग्णसेवा मनोभावे केली जात आहे. यावर्षी नवीन प्रकल्प म्हणून अद्ययावत रोबोटिक सर्जरी उपलब्ध करून देण्याचा मानस असल्याचे त्यांनी सांगितले. कमी खर्चात अधिक चांगली सेवा देण्याचा प्रयत्न सुरू आहे. एमआरआय व इतर तपासण्याही रुग्णांना अल्पदरात उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. अशोक पितळे हे नामवंत सीए असून, त्यांचा परिवार हॉस्पिटलच्या सेवाकार्याशी जोडला गेलेला आहे. मुंबई येथे झालेल्या कॉन्फरन्समध्ये आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या नेत्र विभागाची प्रामुख्याने दखल घेण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी हॉस्पिटलच्या विविध सुरू असलेल्या प्रकल्पांचीही माहिती त्यांनी दिली.

डॉ. विशाल शिंदे यांनी गुडघा प्रत्यारोपण व खुबा प्रत्यारोपण शस्त्रक्रियेची माहिती दिली. गुणवत्तापूर्ण इम्प्लांटसह अल्पदरात शस्त्रक्रिया केल्या जात असल्याचे त्यांनी सांगितले. गोठलेला खांदा, मानदुखी व पाठदुखी याबाबतही उपचारांची माहिती त्यांनी दिली.

डॉ. नितीन कुमार यांनी सर्जरीनंतर शरीराची ताकद कमी होते. मात्र फिजिओथेरपीच्या माध्यमातून पूर्वीप्रमाणे शरीराच्या हालचाली करण्यासाठी सूक्ष्म व्यायाम पद्धती हॉस्पिटलमध्ये दिली जाते, असे सांगितले. योग्य व्यायामामुळे त्या हालचालींसाठी मेंदू सकारात्मक प्रतिसाद देतो. रुग्णांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याचे कामही केले जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या मोफत तपासणी शिबिरात एकूण १३५ रुग्णांची तपासणी करण्यात आली. तज्ज्ञ डॉक्टरांनी अस्थिरोग, मणके व सांधेदुखीबाबत रुग्णांची तपासणी करून त्यांना आवश्यक मार्गदर्शन केले. शिबिरामुळे गरजू रुग्णांना तज्ज्ञ वैद्यकीय सल्ला तसेच पुढील उपचारांबाबत मार्गदर्शन देण्यात आले.



## गुरुवाणी – ३१

### तीर्थंकर परमात्मा आपके साथ है

आश्रव, संवर, निर्जरा, बंध हे चारही तत्व निरंतर चालू असतात. यात सर्वात मोठा रोल जीव तत्व म्हणजे तुमचा आहे. जसे तुमचे स्वप्न असतील तसे तुमचे आश्रव होते. मला प्रवाहात वाहून जायचे की त्यातून बाहेर पडायचे हा निर्णय जीव घेऊ शकतो. घटनांचे मूल्यांकन तुम्ही कसे करता यावर जीवन ठरते. जो मूल्यांकन नाही करत तो अजीव आहे. तुम्ही गांधारी बनता की कुंती बनता? तुमचा निर्णय काय असतो. वनवास पांडवांना होतो, पांडवांच्या इतर पत्नी माहेरी गेल्या. पण द्रौपदीने पांडवांसमवेत वनवास पत्करला. कारण तिला पांडवांना आपल्या लक्ष्यापासून दूर जाऊ द्यायचे नव्हते. राज्याभिषेक होत असताना वनवास मिळणे हे 'दुर्भाग्य' आहे. प्रभू रामाने वनवासाला 'सौभाग्य' बनवले. तुम्ही परिस्थितीचे शिकार बनता की शिकारी बनता? हे महत्त्वाचे. बरेच जण कायम परिस्थितीला दोष देऊन हतबलता व्यक्त करतात. जीव कधीही हतबल होत नसतो. जीव ज्यावेळी हतबलता दर्शवतो, तेव्हा तो जीव असूनही बळीचा बकरा होतो. लंडनमधील एक सत्य घटना आहे. गायींना गाडीतून कत्तलीसाठी नेले जात होते, गायीने गाडीला धक्के मारण्यास सुरुवात केली. ड्रायव्हर बाहेर आला व त्याने दार उघडले. लगेच गाय जोरात बाहेर पडली. गायीनेही परिस्थितीला शरण जाण्यास नकार दिला. म्हणून मनुष्यानेही परिस्थितीपुढे हतबल होऊ नये. स्वतःचे सामर्थ्य, क्षमता विसरू नका. खूप परिश्रमांनी मनुष्य जीवन मिळाले आहे. ते गिफ्ट नाही मिळालय. जो प्रयत्न करून दिवाळी साजरी करतो तो सम्यक्त्वी असतो. जो प्रयत्न करूनही त्याचे दिवाळे निघते तो मिथ्यक्त्वी असतो. जीव, अजीव, निर्जरा, आश्रव, बंध, संवर यात 'जीव' हा चालक आहे. कसे जगायचे हा 'जीव'चा निर्णय आहे. पंतप्रधान म्हणून

सगळ्यांना सारखेच अधिकार असतात. पण कोणी डॉ. मनमोहन सिंग होतो तर कोणी नरेंद्र मोदी. दोघांतील फरक सगळेच जाणतात. आपण सर्वाधिक भक्ती आपल्या तीर्थंकरांची, गुरूंची करतो. तरीही आपण स्वतःला हेल्पलेस समजतो. निर्धार करा माझ्याकडे तीर्थंकर आहेत मी 'हेल्पलेस' होणार नाही. 'कोई हो ना हो तीर्थंकर परमात्मा और गुरूदेव तुम्हारे साथ है''.

– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.

## मोटरसायकलची चोरी

नगर – माळीवाडा वेस परिसरातील नमस्कार चहा दुकानासमोर पार्क केलेली होंडा कंपनीची शाईन मोटरसायकल (क्र.एमएच १७ बीटी १०३८) अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना २३ ऑगस्ट रोजी दुपारी घडली.

या बाबत दिपक रावसाहेब कापसे (वय ५०, रा. घोडेगाव, ता. नेवासा) यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे औषधोपचारासाठी व कामासाठी नगर शहरात आले होते. त्यांनी मोटरसायकल माळीवाडा वेस येथील नमस्कार चहा दुकानासमोर पार्क केली होती. त्यानंतर ते भारत भुवन हॉटेलमध्ये नाष्टा करण्यासाठी गेले व थोड्या वेळाने परत आले असता त्यांची गाडी तेथे दिसून आली नाही. परिसरात व नातेवाईकांकडे शोधाशोध करूनही गाडी न सापडल्याने त्यांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# नगरमध्ये भगवान जिव्हेश्वर जन्मोत्सवाची शोभायात्रा



भगवान जिव्हेश्वर जन्मोत्सवानिमित्त शहरात जिव्हेश्वर यांच्या पालखीची मिरवणूक काढण्यात आली.

नगर – भगवान जिव्हेश्वर जन्मोत्सवानिमित्त बागडपट्टी येथील श्री लक्ष्मीनारायण मंदिरापासून सवाद्य मिरवणुकीला प्रारंभ झाला. ही मिरवणूक नेता सुभाष चौक, चौपाटी कारंजामार्गे दिल्ली गेट येथील पटांगणावरील श्री जिव्हेश्वर मंदिरात महाआरती करून सिद्धी बाग, नवरंग व्यायाम शाळा, बागडपट्टी येथे समारोप करण्यात आला.

पारंपरिक पद्धतीने काढण्यात आलेल्या या मिरवणुकीच्या अग्रभागी भगवान श्री जिव्हेश्वर यांचा चित्ररथ होता. नवनाथ शिक्षण संस्थेच्या बाल वारकऱ्यांनी टाळ–मृदंगाच्या गजरात ज्ञानोबा माऊली तुकारामचा जयघोष करीत भजन सादर केले. संस्कृती श्रीनिवास कनोरे विद्यालयातील विद्यार्थ्यांनी शंकर–पार्वती तसेच शिवभक्त गण यांच्या वेशभूषा करून सादर केलेले शिवतांडव नृत्य, बाल गोपाळांसाठी मोटू, पतलू हे मुख्य आकर्षण ठरले. तसेच महिलांनी फुगडीचा फेर धरून उत्सवात रंगत आणली. या मिरवणुकीतील सर्व समाज बांधवांनी भगवी टोपी व पंचा परिधान केले होते.

पारंपारिक पद्धतीने तुतारीच्या निनादात या मिरवणुकीचे स्वागत करण्यात आले. यावेळी महापौर ज्योतीताई गाडे व जिल्हा परिषदेचे माजी सदस्य सचिन जगताप यांनी भगवान जिव्हेश्वर पालखीचे दर्शन घेतले.


या मिरवणुकीत स्वकुळ हितसंवर्धक मंडळाचे विश्वस्त प्रमुख विक्रम पाठक, माजी उपमहापौर दीपक सूळ, खजिनदार गजेंद्र सोनवणे, सचिव विजय मानकर, कार्याध्यक्ष लक्ष्मीकांत तरोटे, विश्वस्त जितेंद्र लांडगे, संजय सागावकर, बाबासाहेब वैद्य, अभिजीत अष्टेकर, उत्सव समितीचे प्रमुख निरज चांगटे, निरंजन पाठक, उमेश कोदे, चंद्रकांत मानकर, सचिन मडके, प्रशांत मडके, सुनील पावले, अविनाश पावले, काशिनाथ पाठक, सुरेंद्र सोनवणे, प्रवीण जुंदरे, किशोर विंचुरकर, सुरेश इंगळे, प्रसाद कांबळे, संजय दळवी, सोमनाथ खाडे, प्रताप मारवाडे, उल्हास ढोरे, अनिल भंडारे, सचिन पावले, नरेंद्र सोनवणे, विठ्ठल पाठक, शैलेश नगरकर, प्रसाद मडके, निरज सागांवकर, सुधाकर दळवी, मयुर बोचुघोळ, श्रीकांत शेकटकर, विश्वास पाटेकर, गणेश मारवाडे, सुभाष डफळ, निलेश मिसाळ, सचिन कांबळे आदींसह स्वकुळसाळी महिला मंचच्या अध्यक्षा छाया साळी, वनिता पाटेकर, सुरेखा शेकटकर, मृणाल कनोरे, शुभदा वल्ली, स्नेहा पाठक, नुतन पाठक, शैला मानकर, वैशाली येवलेकर, जयश्री कोदे, आरती पाठक, मनिषा चांगटे, मुख्याध्यापिका कल्पना भामरे, स्वाती बागडे, ऋतुजा धोत्रे, पल्लवी कनारे, माधुरी खडामकर, वनिता मानकर, अनिता मानकर, अनिता कांबळे, कल्याणी पावले, शितल सागांवकर, अमृता कांबळे, पुष्पा खाडे, लता सागांवकर आदींसह स्वकुळसाळी समाज बांधव उपस्थित होते.

## सनातन धर्मसभेच्यावतीने २७ ऑगस्टला 'श्रावणी' कार्यक्रम

नगर – येथील सनातन धर्मसभेच्यावतीने नारळी पौर्णिमेच्या निमित्ताने २७ ऑगस्ट रोजी सकाळी आठ वाजता श्रावणीचा कार्यक्रम महाजन गल्ली येथील चतुर्वेद भवन येथे धर्मसभेचे अध्यक्ष वेदमूर्ती महेश रेखे तसेच विक्रमादित्य देवव्रत रेखे यांच्या मंत्रघोषात होणार आहे.

समाजातील सर्व बांधव पुरोहित मंडळ संस्थेचे सभासद, सदस्य यांनी आपली साहित्य घेऊन उपस्थित राहावे, असे आवाहन धर्मसभेचे ज्येष्ठ उपाध्यक्ष निळकंठ देशमुख, मंत्री दिनकरराव देशमुख, खजिनदार उमेश नगरकर, वेदमूर्ती उमेश वाळुंजकर, निलेश धर्माधिकारी आदींनी केले आहे. गेल्या शंभर वर्षांपासून ही संस्था श्रावणीचा कार्यक्रम दरवर्षी आयोजित करते.

श्रावणाच्या निमित्ताने होत असलेल्या या कार्यक्रमास समाजबांधवांनी उपस्थित राहावे, असे आवाहन धर्मसभेचे उपाध्यक्ष डॉक्टर नंदकुमार मुळे, मंत्री रमेश देशपांडे यांनी केले आहे.



चौथी लाइव्ह सर्जरी करणारे डॉ. प्रफुल्ल चौधरी आपल्या सहकाऱ्यांसमवेत.

# अहिल्यानगरचा राष्ट्रीयस्तरावर पुन्हा डंका

## डॉ. प्रफुल्ल चौधरी यांची सलग चौथी लाइव्ह सर्जरी यशस्वी

नगर – अहिल्यानगरच्या वैद्यकीय आणि नेत्रचिकित्सा क्षेत्राच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. येथील नामांकित स्वास्तिक आय इन्स्टिट्यूटचे नेत्रतज्ज्ञ डॉ. प्रफुल्ल चौधरी यांनी बॉम्बे ऑप्थॅलमोलॉजिस्ट्स असोसिएशनद्वारे आयोजित फोकस २०२६ परिषदेत अत्यंत यशस्वी लाइव्ह सर्जरी (डिफर्ड) यशस्वी करुन संपूर्ण देशात जिल्ह्याचा नावलौकिक उंचावला आहे.

या राष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठित परिषदेमध्ये देशाच्या कानाकोपऱ्यातून २,८०० हून अधिक ज्येष्ठ, अनुभवी आणि दिग्गज नेत्रतज्ज्ञ सहभागी झाले होते. एवढ्या मोठ्या आणि नामवंत तज्ज्ञांसमोर आपल्या वैद्यकीय कौशल्याचे आणि शस्त्रक्रियेचे सादरीकरण करण्याची संधी डॉ. प्रफुल्ल चौधरी यांना लाभली. राष्ट्रीय स्तरावर अहिल्यानगरचे प्रतिनिधित्व करण्याची ही सलग चौथी वेळ असल्याने वैद्यकीय वर्तुळातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

यापूर्वी बॉम्बे ऑप्थॅलमोलॉजिस्ट्स असोसिएशन अंतर्गत दोन वेळा, तसेच महाराष्ट्र ऑप्थॅलमोलॉजिकल सोसायटी आणि दिल्ली ऑप्थॅलमोलॉजिकल सोसायटी यांच्या राष्ट्रीय व्यासपीठावर प्रत्येकी एकदा अशा प्रकारे सलग चार वेळा लाइव्ह सर्जरी सादर करण्याचा दुर्लभ बहुमान डॉ. प्रफुल्ल चौधरी यांनी मिळवला आहे. विशेष म्हणजे, फोकस २०२६ मधील त्यांची ही पहिलीच डिफर्ड लाइव्ह सर्जरी ठरली असून, त्यांच्या या कामगिरीने वैद्यकीय क्षेत्रात नवा आदर्श निर्माण केला आहे.

या दैदिप्यमान यशाबद्दल बोलताना डॉ. चौधरी यांनी बीओए फोकस २०२६ च्या आयोजकांचे विशेष आभार मानले. तसेच, या प्रवासात सातत्याने पाठीशी उभे राहिलेले ज्येष्ठ नेत्रतज्ज्ञ, सहकारी, मित्रपरिवार आणि स्वास्तिक आय इन्स्टिट्यूटच्या संपूर्ण टीमच्या योगदानामुळेच हे यश संपादन करणे शक्य झाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

# प्रा. सुहास एन. तोरडमल यांना कायदेविषयक क्षेत्रात पीएच.डी.



नगर – न्यू लॉ कॉलेजचे प्रा. सुहास एन. तोरडमल यांना कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाकडून कायदेविषयक क्षेत्रात पीएच. डी. पदवी प्रदान करण्यात आली. द सिग्निफिकंट रोल अँड इमपोर्टंट फंक्शन ऑफ प्रोग्रॅम इन द क्रिमिनल जस्टिस सिस्टम–अॅन ॲनालिटिकल स्टडी या विषयावर त्यांनी विद्यापिठास प्रबंध सादर केला होता.

फौजदारी न्यायव्यवस्थेतील अभियोजनाची महत्त्वपूर्ण भूमिका, सार्वजनिक अभियोक्त्यांची कार्ये व जबाबदाऱ्या, न्यायप्रक्रियेत अभियोजनाचे योगदान तसेच प्रभावी, निष्पक्ष आणि न्याय्य फौजदारी न्यायव्यवस्था निर्माण करण्यासाठी आवश्यक असलेल्या सुधारणांचा या संशोधनातून सविस्तर अभ्यास करण्यात आला आहे. अभियोजन यंत्रणेच्या कार्यक्षमतेसमोरील विविध आव्हाने तसेच न्यायदान प्रक्रिया अधिक परिणामकारक करण्यासाठी आवश्यक उपाययोजनांचाही संशोधनात सखोल अभ्यास करण्यात आला आहे.

पीएच.डी. अंतिम मौखिक परीक्षेचे काम प्रा. डॉ. गजानन मेहेकरकर, डॉ. विजय बहिरम, प्रा. डॉ. एन. डी. चौधरी यांनी पाहिले. तर बाह्य परीक्षक म्हणून प्रा. डॉ. कल्पना जावळे, तसेच मार्गदर्शक डॉ. नयना नितीन महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन पूर्ण झाले. प्रा. तोरडमल यांना डॉ. बी. युवाकुमार रेड्डी, डॉ. दीपक क्षीरसागर, डॉ. विजेता सिंह, डॉ. योगेश महाजन, डॉ. रेखा पाहुजा, डॉ. अंजली बोंदार, डॉ. बी. डी. पांढरे, डॉ. संदीप सातभाई, डॉ. ए. एल. मोरे आणि डॉ. ललिता सपकाळे, न्यू लॉ कॉलेजचे प्राचार्य डॉ. एम. एम. तांबे यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे अध्यक्ष रामचंद्र दरे, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, सचिव अॅड. विश्वासराव आठरे पाटील, खजिनदार अॅड. दीपलक्ष्मी म्हसे, सहसचिव मुकेश मुळे तसेच संस्थेचे पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्य यांनी प्रा. सुहास एन. तोरडमल यांचे अभिनंदन केले.



विश्वविक्रम केल्याबद्दल रामगिरी महाराज यांना विश्वविक्रमाचे प्रमाणपत्र प्रदान करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटल, दीपक हरके.

# एकाच ठिकाणी ५ लाख २५ हजार ५११ भाविकांचा 'वंदे मातरम्'च्या सामूहिक गायनाचा 'विश्वविक्रम'

नगर – श्री क्षेत्र धनगरवाडी येथे संत योगीराज सद्गुरू गंगागिरी महाराज यांच्या १७९ व्या अखंड हरिनाम सप्ताहात २५ ऑगस्ट रोजी श्रीक्षेत्र सरला बेटचे विद्यमान मठाधिपती महंत रामगिरी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली ५ लाख २५ हजार ५११ भाविकांनी एकाच वेळी वंदे मातरम्चे सामूहिक गायन करून नवा विश्वविक्रम प्रस्थापित केला.

वंदे मातरम्चे एकाच वेळी सर्वाधिक लोकांनी केलेल्या सामूहिक गायनाचा यापूर्वीचा विश्वविक्रम १ लाख ४ हजार ६३७ सहभागींच्या नावावर होता. हा विक्रम १२ जानेवारी २०१० रोजी पुणे येथे द आर्ट ऑफ लिव्हिंग फाउंडेशनने आयोजित केलेल्या अंतर्नाद या संगीत कार्यक्रमात नोंदविण्यात आला होता. धनगरवाडी येथील विश्वविक्रमाचे प्रमाणपत्र श्रीक्षेत्र सरला बेटचे मठाधिपती महंत रामगिरी महाराज यांना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील, विनर्स बुक ऑफ रेकॉर्ड्स वर्ल्डचे अध्यक्ष आणि १८४ विश्वविक्रम करणारे पहिले भारतीय डॉ. दीपक हरके यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

मिस इंडिया आणि विनर्स बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्सच्या चेअरमन डॉ. ईशा अग्रवाल यांनीही सरला बेटचे मठाधिपती महंत रामगिरी महाराज यांचे या ऐतिहासिक कामगिरीबद्दल अभिनंदन केले. या कार्यक्रमास श्रीक्षेत्र सरला बेटचे विश्वस्त मधु महाराज, खा. भाऊसाहेब वाकचौरे, आ. विवेक कोल्हे, आ.आशुतोष काळे, आ. रमेश बोरनारे, आ. अमोल खताळ, आ. विठ्ठल लंघे तसेच काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात आदी उपस्थित होते.



प्राथमिक शिष्यवृत्ती परिक्षेत अहिल्यानगरमधील बागडपट्टी येथील हिंद सेवा मंडळाच्या प्राथमिक शाळेतील विद्यार्थी चिन्मय म्हस्के, जिविका ताकपिरे व राजकुमार बनारसी मिळवलेल्या यशाबद्दल त्यांचा सत्कार करताना शाळेचे चेअरमन मधुसूदन सारडा, मुख्याध्यापक विठ्ठल उरमुडे आदी.

# शिष्यवृत्ती परिक्षेत चिन्मय म्हस्के गुणवत्ता यादीत जिल्हयात प्रथम

नगर – इयत्ता चौथीच्या झालेल्या प्राथमिक शिष्यवृत्ती परिक्षेत अहिल्यानगरमधील बागडपट्टी येथील हिंद सेवा मंडळाच्या प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करत राज्यात व जिल्ह्यात डंका वाजवला आहे. शाळेतील विद्यार्थी चिन्मय म्हस्के हा गुणवत्ता यादीत राज्यात आठवा तर जिल्हयात प्रथम आला आहे. तसेच जिविका ताकपिरे ही जिल्हा गुणवत्ता यादीत १९४ वी व राजकुमार बनारसी याने जिल्हा गुणवत्ता यादीत २१० वे स्थान पटकावत शिष्यवृत्ती मिळविली आहे. विद्यार्थ्यांच्या या घवघवीत यशाबद्दल त्यांचे शाळेत ढोल ताशाच्या गजरात पुष्पवृष्टी करून जल्लोषात स्वागत करण्यात आले. तसेच शाळेचे चेअरमन मधुसूदन सारडा व मुख्याध्यापक विठ्ठल उरमुडे यांनी तिन्ही विद्यार्थ्यांचा सत्कार करून अभिनंदन केले.

मधुसूदन सारडा म्हणाले, चिन्मय म्हस्के हा राज्यात गुणवत्ता यादीत आठवा तर जिल्हयात प्रथम येऊन आपल्या शाळेचे नाव राज्यात उंचावले आहे. भविष्यातील यशासाठी सर्व विद्यार्थ्यांनी या तिन्ही विद्यार्थ्यांपासून प्रेरणा घ्यावी व यापेक्षा अधिक मोठे यश मिळवावे. मुख्याध्यापक विठ्ठल उरमुडे म्हणाले, चिन्मय म्हस्के, जिविका ताकपिरे व राजकुमार बनारसी यांनी चौथीच्या शिष्यवृत्ती परिक्षेत मिळवलेल्या घवघवीत यशामुळे त्यांना आता शासनाची दरवर्षी शिष्यवृत्ती मिळणार आहे. त्यामुळे इतर विद्यार्थ्यांनी त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन भरपूर मेहनत घेऊन शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली भरपूर अभ्यास करावा. या यशस्वी विद्यार्थ्यांना शाळेचे मुख्याध्यापक विठ्ठल उरमुडे, मनिषा साळी, व मुद्सीर पठाण या शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

# केडगावमध्ये साई सच्चरित्र पारायणास प्रारंभ



केडगाव येथे साई सच्चरित्र ग्रंथाचे पारायण करताना भाविक.

नगर – केडगाव येथील बँक कॉलनी परिसरातील श्री साईबाबा मंदिराच्या तेराव्या वर्धापन दिनानिमित्त विविध धार्मिक, आध्यात्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्त श्री साई सच्चरित्र ग्रंथाचे पारायण सुरु करण्यात आले असून, ३१ ऑगस्ट रोजी केडगाव परिसरात साईबाबांच्या पालखी व पादुकांची मिरवणूक काढण्यात येणार आहे.

या पारायण सोहळ्याचा प्रारंभ २५ ऑगस्ट रोजी राजू सातपुते यांच्या हस्ते श्री साई सच्चरित्र ग्रंथाचे विधिवत पूजन करून भक्तिमय वातावरणात करण्यात आला. यावेळी श्री साई सच्चरित्र ग्रंथाचे पारायण वाचन श्रीनिवास सहदेव यांच्या वाणीतून होत आहे. पारायणाच्या निमित्ताने मंदिर परिसरात भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, मोठ्या संख्येने साईभक्त पारायणात सहभागी होत आहेत.

श्री साईबाबा मंदिराचा वर्धापन दिन विविध धार्मिक कार्यक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. यामध्ये काकड आरती, दुग्धाभिषेक, महापूजा यांसह विविध धार्मिक विधींचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच सामाजिक बांधिलकी जपत मोफत आरोग्य तपासणी शिबिर व रक्तदान शिबिराचेही आयोजन करण्यात आले आहे.

वर्धापन दिनानिमित्त मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. ३१ ऑगस्ट रोजी श्री साईबाबांच्या पालखी व पादुकांची मिरवणूक शाहूनगर तसेच संपूर्ण केडगाव परिसरातून काढण्यात येणार आहे. साईनामाच्या जयघोषात निघणाऱ्या या मिरवणुकीत साईभक्त सहभागी होणार आहेत. तसेच १ सप्टेंबर रोजी श्री साई कथाकार माधुरीताई शिंदे (शिर्डी) यांचे प्रवचन आयोजित करण्यात आले आहे. याच दिवशी विविध मान्यवरांच्या हस्ते मध्यान्ह आरती करण्यात येणार आहे.

यावेळी महाप्रसादचे आयोजनही करण्यात आले. या सर्व धार्मिक, आध्यात्मिक व सामाजिक कार्यक्रमांचा लाभ केडगाव परिसरासह नगर शहरातील सर्व साईभक्तांनी घ्यावा, असे आवाहन श्री साईबाबा फाउंडेशनच्या वतीने करण्यात आले आहे.

